## थोडक्यात

### अन्सारी अनम फातिमा हिचा पहिला रोजा उत्साह पूर्वक संपन्न

पात्रूड । प्रतिनिधी



तालुक्यातील पात्रुड येथील दैनिक राज्य लोकतंत्र चे प्रतिनिधी अनिस अन्सारी यांची कन्या अन्सारी अनम फातिमा अनिस हिने सोमवार दि. २ मार्च २०२६ रोजी पवित्र रमजान महिन्यात वयाच्या ८ व्या वर्षी आयुष्यातील पहिला रोजा (उपवास) मोठ्या श्रद्धेने आणि उत्साहाने पूर्ण केला. बालवयामध्येच धार्मिक कर्तव्याची जाणीव ठेवून तिने हा रोजा पूर्ण केल्याने या बालिकेच्या कुटुंबीय व नातेवाईकांमधून आनंद व्यक्त केला जात आहे. अन्सारी अनम फातेमा अनिस ही बालिका इयत्ता ३ री वर्गात शिक्षण घेत असून तिने एवढ्या लहान वयामध्ये धार्मिक संस्कार जोपासत आपला पहिला रोजा पूर्ण केल्याने तिचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे. तसेच नातेवाईक व मित्रपरिवाराकडून तिचे अभिनंदन केले जात आहे. या मालिकेने एवढ्या लहान वयामध्ये आपल्या आयुष्यातील पूर्ण केलेला पहिला रोजा हा आदर्श लहान बालकांसाठी खरोखरच प्रेरणादायी ठरणारा आहे.

### इक़रा पब्लिक स्कूल, माजलगाव येथे राष्ट्रीय विज्ञान दिन उत्साहात साजरा

माजलगाव । प्रतिनिधी

इक़रा पब्लिक स्कूल, माजलगाव येथे दिनांक २८ फेब्रुवारी रोजी राष्ट्रीय विज्ञान दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या निमित्ताने शाळेत विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थ्यांनी विविध वैज्ञानिक प्रयोगांची मॉडेल्स तयार करून सादर केली तसेच आकर्षक चार्ट तयार करून विज्ञानातील संकल्पना सोप्या भाषेत समजावून सांगितल्या.



शाळेचे मुख्याध्यापक शेख तौसीफ सर यांनी राष्ट्रीय विज्ञान दिन हा महान भारतीय शास्त्रज्ञ सर चंद्रशेखर वेंकट रमण यांच्या सन्मानार्थ साजरा केला जातो, असे सांगितले. त्यांनी विद्यार्थ्यांना 'रमण परिणाम' या त्यांच्या महत्त्वपूर्ण शोधाविषयी सविस्तर माहिती देत विज्ञानाचे महत्त्व स्पष्ट केले व विद्यार्थ्यांना संशोधनाची प्रेरणा दिली. तसेच शाळेचे अध्यक्ष शेख अब्दुल गनी सर यांनी प्रदर्शनात सहभागी झालेल्या सर्व विद्यार्थ्यांचे कौतुक करून त्यांचे मनोबल वाढवले. विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या कल्पक आणि अभ्यासपूर्ण प्रकल्पांचे विशेष अभिनंदन करण्यात आले.

या विज्ञान प्रदर्शनाच्या यशस्वी आयोजनासाठी शाळेतील शिक्षकांचेही मोलाचे योगदान लाभले. शेख परवीन मॅडम, मोमिन नोमान सर, सादिया मॅडम, सुहाना मॅडम आणि अदीबा मॅडम यांनी विद्यार्थ्यांना विज्ञान मॉडेल तयार करण्यासाठी तसेच त्यांचे सादरीकरण करण्यासाठी मार्गदर्शन केले. सर्व शिक्षकांच्या सहकार्यामुळे कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पडला.या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये विज्ञानाबद्दल आवड, जिज्ञासा आणि संशोधनाची भावना निर्माण झाली असून हा दिवस विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी व संस्मरणीय ठरला.

# छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान यशस्वीपणे राबवा-जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील सर्व महसूल मंडळांमध्ये महसूल सेवा अधिक लोकाभिमुख करण्यासाठी आणि नागरिकांचे प्रलंबित प्रश्न तातडीने निकाली काढण्यासाठी बीड जिल्हा प्रशासनामार्फत छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समापन शिबिर अभियान टप्पा २ राबविण्यात येणार आहे. बीडचे जिल्हाधिकारी मा. विवेक जॉन्सन (भा.प्र.से.) यांनी दि. २६.०२.२०२६ रोजी सर्व उपविभागीय अधिकारी, सर्व तहसीलदार आणि महसूल मंडळाधिकारी व इतर विभागांच्या जिल्हास्तरीय आढावा बैठकीत हे अभियान १०० टक्के यशस्वी करण्याचे निर्देश दिले आहेत.

हे अभियान ८ मार्च २०२६ ते १५ मे २०२६ या कालावधीत राबविले जाणार आहे. सामान्य जनता, शेतकरी, महिला



आणि विद्यार्थी यांचे महसूल विभागाशी संबंधित दैनंदिन प्रश्न एकाच ठिकाणी निकाली काढणे, हा या अभियानाचा मुख्य उद्देश आहे. ''एकाच दिवशी सेवा वितरण '' या संकल्पनेवर हे अभियान आधारित असेल.

या शिबिरांमध्ये नागरिकांना खालीलप्रमाणे महत्त्वाच्या सेवा उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत.

दाखले वाटप: विद्यार्थ्यांसाठी शाळा/कॉलेज प्रवेशासाठी आवश्यक दाखले दिले जातील. लोकसेवा हक्क कायद्यानुसार प्रलंबित अर्ज निकाली काढून तसेच पूर्वी प्राप्त अर्जांच्या अनुषंगाने प्राप्त वितरण करणे.

७/१२ अद्ययावत करणे: प्रलंबित व विवादास्पद फेरफार निकाली काढणे, जिवंत ६/१२, मोहीमांतर्गत अद्ययावत ७/१२ चे वाटप आणि फेरफार नोंदी दुरुस्त केल्या जातील.

जमिनी संबंधित प्रकरणे: भोगवटादार वर्ग-१ जमीन वर्ग-२ मध्ये परावर्तित करणे, अकृषिक सुधारणा कायद्यानुसार गरजीनुसार करणे, तुकडेबंदी कायद्यान्वये फेरफार आणि अकृषिक परवानी नोंदी अद्ययावत केल्या जातील.

सामाजिक अर्थसहाय्य: विविध शासकीय योजनांच्या पात्र लाभार्थ्यांना मंजुरी आदेशांचे वाटप करण्यात येईल.

डिजिटल ७/१२: महाभूमी पोर्टलवरील डिजिटल ७/१२ ला पूर्ण कार्यान्वित ठेवत असल्याबाबत जनजागृती करणे.

कमी-जास्त पत्रके: भूसंपादन व अकृषिक परवानी दिलेल्या प्रकरणांत 'कमी-जास्त पत्रके' तयार करून गाव नमुने अद्ययावत करणे बाबत शासन निर्णयातील तरतुदीनुसार कार्यवाही करण्यात येईल.

इतर सेवा: सुधारणा व नागरी सुविधा, समाधान शिबिरामध्ये एक खिडकी सुविधा अंतर्गत आधार नोंदणी दुरुस्ती, ई-नामजारी, अंशांक, पी.एम. किसान व तक्रार निवारण कक्ष (जनता दरबार).

१८ फेब्रुवारी ते ५ मार्च या कालावधीत अभियानाची पूर्वतयारी करण्यात येत आहे. यामध्ये संभाव्य लाभार्थ्यांची यादी तयार करणे, लोकप्रतिनिधींशी संवाद साधणे आणि गावोगावी दवंडी व सोशल मीडियाद्वारे जनजागृती करण्याच्या सूचना जिल्हाधिकाऱ्यांनी दिल्या आहेत.करिता छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समापन शिबिर अभियानांतर्गत वरीलप्रमाणे देण्यात येणाऱ्या सर्व सेवांचा लाभ बीड जिल्ह्यातील सर्व नागरिकांनी, शेतकरी आणि विद्यार्थ्यांनी आपल्या जवळच्या महसूल मंडळ स्तरावरील शिबिराची माहिती घेऊन या अभियानाचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा, असे आवाहन मा. विवेक जॉन्सन, जिल्हाधिकारी बीड, यांनी केले आहे.

## भैय्यासाहेब आदोडे यांचा श्रीपाल सबनीस यांच्या हस्ते राज्यस्तरीय समाजरत्न पुरस्कार देऊन सन्मान

परळी । प्रतिनिधी

येथील सामाजिक कार्यकर्ते, शिक्षक भैय्यासाहेब आदोडे यांचा जेष्ठ विचारवंत व ८९ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष श्रीपाल सबनीस यांच्या हस्ते समाज रत्न पुरस्कार देऊन नुकतेच सन्मानित करण्यात आले.

समाजप्रबोधन, स्वच्छता आणि समतेचा अखंड संदेश देणारे राष्ट्रसंत गाडगेबाबा यांच्या १५० व्या जयंतीनिमित्त परळी येथे भव्य सुवर्ण शतकोत्तर महोत्सवी वर्ष सोहळा दि.२३ फेब्रुवारी २०२६ रोजी उत्साहात संपन्न झाला.संत गाडगेबाबा बहुउद्देशीय सेवाभावी संस्था परळी आयोजित कार्यक्रमाचे अध्यक्षपद ज्येष्ठ साहित्यिक व ८९ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष श्रीपाल सबनीस यांनी भूषविले. उद्घाटक म्हणून



समाजकल्याण विभागाचे सहाय्यक आयुक्त विशाल लोंढे उपस्थित होते तर प्रमुख पाहुणे म्हणून कीर्तनकार ह.भ.प. ज्ञानेश्वर महाराज वाबळे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे आयोजन लोकनेते गोपीनाथराव मुंडे नटराज रंगमंदिर येथे करण्यात आले होते.

यावेळी राष्ट्रसंत गाडगेबाबा राज्यस्तरीय समाजरत्न पुरस्कार सामाजिक कार्यात शिक्षण क्षेत्रात योगदान दिल्याबद्दल भैय्यासाहेब आदोडे यांना मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.फुले , शाहू, आंबेडकर चळवळीत सक्रिय असणारे भैय्यासाहेब आदोडे सर हे परळी शहरातील विविध सामाजिक व सांस्कृतिक आणि शैक्षणिक उपक्रमात सहभागी असतात.त्यांना मिळालेल्या या पुरस्काराबद्दल सर्वत्र त्यांचे अभिनंदन होत आहे.परळी ,रमेश सोनाळे नांदेड, प्रा.डॉ. किशोर वाघ संभाजीनगर, अरविंद कांबळे संभाजीनगर, मनोहर व्हावळे गंगाखेड, पंडित जिंजुर्डे परळी, अनंत इंगळे परळी, जयवर्धन सूर्यवंशी परळी यांना समाज रत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.प्रस्ताविकपर भाषणात कार्यक्रमाचे आयोजक पृथ्वी शिंदे यांनी केले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आदर्श शिक्षक लक्ष्मण वैराळ यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी संयोजक पृथ्वी शिंदे तसेच निमंत्रक सुशिल पोटभरे, रोहित झिंजुर्डे, विकास वाघमारे, राहुल सूर्यवंशी, विशाल डोंबे, महेश मुंडे आदींनी परिश्रम घेतले.

## पान ६ वरून...

### भूमी अभिलेख कर्मचाऱ्यांच्या

कर्मचाऱ्यांच्या प्रमुख मागण्यांमध्ये तांत्रिक वेतनश्रेणी लागू करणे, भूकरमापक व परिरक्षण भूकरमापक यांचा वाढीव पदांसह सुधारित आकृतीबंध मंजूर करणे, मोजणी कर्मचाऱ्यांना निश्चित प्रवासभत्ता वेतनात समाविष्ट करणे, तांत्रिक ज्ञान नसलेल्या अधिकाऱ्यांची या विभागात बदली अथवा प्रतिनियुक्ती थांबवणे, विभागाच्या खाजगीकरणाचा निर्णय रद्द करणे, तसेच शेत रस्ते मोजणी व हद्दकायाम बाबत दिनांक २६ ऑगस्ट २०२५ च्या शासन निर्णयात सुधारणा करणे यांचा समावेश आहे.

याशिवाय मोजणी ही बाब धोरणात्मक स्वरूपात समाविष्ट करू नये, भूमी अभिलेख विभाग हा तांत्रिक विभाग असल्याने जमाबंदी आयुक्त व संचालक ही संवर्ग पदे () मधून भरावीत,अशीही मागणी करण्यात आली आहे. या आंदोलनामुळे शेतकरी व सामान्य नागरिकांना होणाऱ्या गैरसोयीबाबत कर्मचाऱ्यांनी खेद व्यक्त केला असून, शासनाने वेळेत सकारात्मक निर्णय घ्यावा, अन्यथा आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशारा भूमी अभिलेख कर्मचारी कृती समिती बीड जिल्हा संघटनेच्या वतीने देण्यात आला आहे.

### आष्टीत रंगली विकासाची

जगताप,बजरंग कर्डिले,नानाभाऊ वाडेकर,संजय चंदनशिव,सोपान गाडे,आबासाहेब तावरे,आदिनाथ गवळी,भागवत वारे,बबन सांगळे,बाळासाहेब शेकडे,विकास वनवे,गणेश सांगळे,आदेश निमोनकर,सचिन नालकोल, निलेश सोनवणे,सय्यद शहाबुद्दीन,चंद्रशेखर साके,संजय नालकोल,महारुद्र खेडकर,धोंडीबा सांगळे,सूर्यभान सांगळे, दीपक बोराडे आदी मान्यवर व पाटोदा,शिरूर तालुक्यातील शेतकरी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.या दुष्काळी पट्ट्यातील शेतकऱ्यांचा वनवास कायमचा संपवण्यासाठी पाणी कसे उपलब्ध होईल यावर दोन्ही नेत्यांनी सविस्तर आणि अभ्यासपूर्ण मंथन केले.

हार्वेस्टरमुळे बेकारी वाढेल,सिंचन हाच पर्याय -माजी आ.भीमराव धोंडे

यावेळी बोलताना माजी आ.भीमराव धोंडे यांनी भविष्यातील संकटावर बोट ठेवले.ते म्हणाले,बीड हा ऊसतोड कामगारांचा जिल्हा आहे.भविष्यात ऊसतोडीसाठी हार्वेस्टरचा वापर वाढल्यास या मजुरांवर बेकारीची कुऱ्हाड कोसळेल. मुळातच पर्जन्यमान कमी असल्याने आपले तालुके दुष्काळी म्हणून गणले जातात.त्यामुळे येथे सिंचनाच्या सुविधा निर्माण करून पाणी आणणे ही काळाची गरज आहे.यासाठी सर्व मंत्र्यांची भेट घेणार असल्याचे सांगतानाच,न भूतो न भविष्यती अशी लोकचळवळ उभारू आणि जनसामान्यांच्या रेट्यामुळे आपला हा विषय अंतिम टप्प्यात यशस्वी करू असा ठाम विश्वास त्यांनी व्यक्त केला.मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री या मागणीला सकारात्मक प्रतिसाद देतील, अशी आशाही त्यांनी व्यक्त केली.

सत्तेत असलो तरी प्रश्नांसाठी रस्त्यावर उतरू -- माजी आ.बाळासाहेब आजबे

माजी आ. बाळासाहेब आजबे यांनी या प्रश्नावर तांत्रिक आणि अभ्यासपूर्ण मांडणी केली.जायकवाडी धरणातून काही भागाला पाणी मिळणे,खुंटेफळ प्रकल्पाचे ४ टीएमसी पाणी आणि सीना प्रकल्पाच्या आवर्तनातून पाणी उपलब्ध करून देणे आवश्यक आहे असे माजी आ.आजबे म्हणाले. प्रशासकीय पातळीवर योग्य पाठपुरावा करून हा प्रश्न मार्गी लावण्यासाठी आपण कटिबद्ध आहोत.सत्तेत असलो तरी जनहिताच्या आणि शेतकऱ्यांच्या प्रश्नासाठी रस्त्यावर उतरून आंदोलन करण्याची आपली पूर्ण तयारी असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.राजकीय समीकरणे बदलणार ? एरवी राजकीय आखाड्यात वेगळ्या भूमिका घेणारे हे दोन बडे नेते मतदारसंघाच्या हितासाठी एकत्र आल्याने कार्यकर्त्यांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले आहे.या एकाधिकारशाही मोडून काढणाऱ्या ऐतिहासिक निर्णयामुळे भविष्यातील राजकीय आणि सामाजिक समीकरणे बदलतील असा अंदाज राजकीय विश्लेषकांकडून वर्तवला जात आहे. बैठकीच्या शेवटी दोन्ही नेत्यांनी आणि कार्यकर्त्यांनी एकमेकांना रंग लावून खऱ्या अर्थाने विकासाचे धुलीवंदन साजरे केले.

शेतकऱ्यांच्या शाश्वत पाणी योजनेवर व्यापक चर्चा!

आष्टी,पाटोदा,शिरूर हे तालुके सिंचनाच्या बाबतीत अत्यंत मागे आहेत. भविष्यातील यांत्रिकीकरणा मुळे (हार्वेस्टर) ऊसतोड कामगारांसमोर रोजगाराचे मोठे संकट उभे राहू शकते.या पार्श्वभूमीवर,विविध मार्गांनी या दुष्काळी पट्ट्यात पाणी आणणे क्रमप्राप्त आहे.यासाठी लवकरच मंत्रिमंडळाशी चर्चा करून जनहिताच्या या विकास योजनेला मूर्त स्वरूप देण्यासाठी शेवटपर्यंत लढा देण्याचा निर्धार माजी आ.भीमराव धोंडे आणि बाळासाहेब आजबे यांनी या बैठकीत व्यक्त केला.

## विज्ञान प्रदर्शनाने सी.व्ही रमण यांना अभिवादन

वडवणी । प्रतिनिधी

राष्ट्रीय विज्ञान दिना हा भौतिक शास्त्रातील जगातील सर्वोच्च नोबेल पुरस्कार..!प्राप्त भारताचे शास्त्रज्ञ असलेले श्री.सी व्ही रमण यांच्या कार्याचा गौरव म्हणून सर्वत्र साजरा केला जातो. शासकीय माध्यमिक आश्रम शाळा थेटेगव्हाण ता.धारूर जि.बीड या शाळेमध्ये छत्रपती संभाजीनगर प्रकल्पाच्या प्रकल्प अधिकारी श्रीमती.चेतना मोरे मॅडम यांच्या प्रेरणेने,श्री.डॉ.उद्धव वायाळ सर प्रकल्प अधिकारी तथा पालक अधिकारी तसेच श्री.गजानन बनसोडे सहाय्यक प्रकल्प अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली तर श्री पुरुषोत्तम कायंदे आदिवासी विकास निरीक्षक,श्री.लाला जाधव यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये व शाळेचे मुख्याध्यापक श्री.सखाराम वनवे सर यांच्या नियोजनाने शाळेमध्ये विज्ञान प्रदर्शन भरवत सी व्ही रमण यांना




अभिवादन करण्यात आले.भारताचे मिसाईल मॅन डॉ.ए.पी.जे अब्दुल कलाम,सी व्ही रमण यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.अनेक विद्यार्थ्यांनी विज्ञान प्रदर्शनामध्ये प्रयोगाचे सादरीकरण करून विज्ञानाचे भौतिक, जैविक, रासायनिक होणारे बदल प्रयोगाच्या माध्यमातून सादरीकरण करून, प्रमुख अतिथींचे लक्ष वेधून घेतले. पर्यवेक्षकांनी निरीक्षण करत प्रदर्शनामधील सर्वोत्कृष्ट प्रयोगाचे क्रमांक काढत.. मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र व ट्रॉफी देऊन क्रमांक पटकावलेल्या सहभागी विद्यार्थ्यांना सन्मानित करण्यात आले.या कार्यक्रमासाठी विज्ञान शिक्षक यांनी विशेष परिश्रम घेत. सर्व शिक्षक वृंद यांनी विज्ञान प्रदर्शनासाठी दिलेली जबाबदारी समर्थपणे पार पाडली.त्यामुळे शाळेतील विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट प्रयोगाचे सादरीकरण केले.

## भारतीय बौद्ध महासभेच्या वतीने समता सैनिक प्रशिक्षण शिबीर संपन्न

माजलगाव । प्रतिनिधी

भारतीय बौद्ध महासभेचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष आद.डॉ भिमराव यशवंतराव आंबेडकर साहेबांच्या आदेशानुसार गांव तिथे शाखा आणी घर तिथे समता सैनिक निर्माण करण्यासाठी भारतीय बौद्ध महासभा तालुका शाखा माजलगाव च्या वतीन सांची बुद्ध विहार डॉ आंबेडकर भवन येथे शनिवार दि.२८/२/२०२६ते रविवार दि.१/३/२०२६ या कालावधीत दोन दिवसिय महिला/ पुरुष समता सैनिक दल प्रशिक्षण शिबीराचे आयोजन करण्यात आले होते या शिबीरासाठी प्रशिक्षक म्हणुन समता सैनिक दलाचे मेजरजनरल आद.राजाभाऊ आठवले,आद .डॉ एस व्ही बोबडेसर व महिला प्रशिक्षक आद. प्रतिभाताई वाघमारे हे होते तर या शिबीराचे अध्यक्ष डॉ भागवत साळवे ता अध्यक्ष भारतीय



बौद्ध महासभा माजलगाव हे होते तर या शिबीरा चे प्रस्ताविक महिला तालुका अध्यक्षा मंदाताई साळवेयांनी केले तर उदघाटन भारतीय बौद्ध महासभच्या महिला जिल्हा अध्यक्षा आद कमलताई डोंगरे यांच्या हस्ते मेनबत्ती प्रज्वलित करुन,समता सैनिक दलाच्या ध्वजा चे ध्वजारोहण करुन करण्यात आले या शिबीरामध्ये तालुक्यातील ५४ महिला ३२ पुरुष एकुण ८६ शिबीरार्थी यांनी सहभाग घेतला होता या शिबीरा साठी भारतीय बौद्ध महासभा बीड पुर्व जिल्हा अध्यक्ष ॲड बी बी धन्वे सर, महिला जिल्हा उपाध्यक्षा लिलाताई उजगरे,जिल्हा महिला संस्कार सचिव संजिवनीताई धन्वे, जिल्हा पर्यटन सचिव,के व्ही साळवे गेवराई तालुका संरक्षण सचिव तथा समता सैनिक नवनाथ त्रिभुवन,आठवले ताई, सोनवने ताई,प्रा संजय बागुल सर ,राजकुमार सोनवने सर, श्रीमंत डोंगरे,सदधम्म सेवासंघाचे सचिव जि एन घनघाव सर यांच्या सह धम्म उपासक उपासिका मोठ्या संख्येन उपस्तीत होते

## राजमाता मार्गदर्शन केंद्राची केंद्रिय सैनिक विद्यालय प्रवेशपूर्व परिक्षेत उत्तुंग भरारी

वडवणी । प्रतिनिधी

वडवणी व ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी गुणवत्तेचे प्रवेशव्दार असणाऱ्या येथील राजमाता मार्गदर्शन केंद्राच्या विद्यार्थ्यांनी केंद्रिय सैनिक विद्यालय प्रवेश पूर्व परिक्षेत नेत्रदिपक असे सुवर्ण यश मिळवले असून गुणवत्तेत उत्तुंग भरारी घेत वडवणी सारख्या ग्रामीण भागातून देखील पाच पेक्षा जास्त विद्यार्थी दोनशेहून अधिक पुन्हा गुणांनी या परिक्षेत उत्तीर्ण झालेले आहेत. या विद्यार्थ्यांना वेळोवेळी मार्गदर्शन करणारे त्यांचे मार्गदर्शक अंगद मद्देवाड सर व पवन आरसेवाड सर यांचे व उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे सर्वत्र अभिनंदन व कौतुक होत आहे.

मागील अनेक वर्षांपासून वडवणी शहरासह तालुक्यातील ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी स्पर्धात्मक मार्गदर्शनासाठी नेहमी एक आशेचा किरण व गुणवत्तेचे प्रवेशव्दार असलेल्या येथील राजमाता मार्गदर्शन केंद्राच्या शिरपेच्यात पुन्हा एकदा मानाचा तुरा रोवला गेला आहे. इयत्ता पाचवीतील विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती, नवोदय, त्याचप्रमाणे केंद्रिय सैनिक विद्यालय प्रवेशपूर्व परिक्षेची तयारी या मार्गदर्शन केंद्राच्या माध्यमातून व अंगद मद्देवाड सर व पवन आरसेवाड सर सर या दोन्ही मार्गदर्शकांच्या अथक परिश्रमातून करण्यात आली होती. विद्यार्थ्यांनीही त्यांच्या स्वप्नांना व अपेक्षांना उत्तम अशा निकालातून वेळोवेळी एक प्रकारे बळ देण्याचे काम केलेले आहे, व ते करतही आहेत. नुकत्याच जानेवारी महिन्यात संपन्न झालेल्या केंद्रिय सैनिक विद्यालय प्रवेशपूर्व परिक्षेचा निकाल शुक्रवारी जाहीर झाला असून या निकालात राजमाता मार्गदर्शन केंद्राचे चि.अथर्व बंडू नागरगोजे याने ३०० गुणांपैकी



तब्बल २८४ गुण, चि.राजवीर बाळासाहेब घुगे याने २६८ गुण, कु.तनिष्का उध्दव बडे हिने २५९ गुण, कु.स्वानंदी बाबु गवळी हिने २१६ गुण, कु.मनवा ज्ञानेश्वर वाव्हळ हिने २०६ गुण मिळवून ते तसेच इतरही अनेक विद्यार्थी प्रवेशास पात्र झाले आहेत. विशेष

म्हणजे चि.अथर्व बंडू नागरगोजे याने ३०० गुणांपैकी तब्बल २८४ गुण मिळवत संपूर्ण भारत देशातून या परिक्षेत १६८ वा क्रमांक पटकाविण्याचा पराक्रम केला आहे. दरम्यान इयत्ता सहावी प्रवेशासाठी ही परिक्षा आयोजित करण्यात आलेली होती. अतिशय अवघड प्रश्नांचा या परिक्षेत समावेश असतो. संपूर्ण पेपरची काठिन्यपातळी अधिक असते तसेच ग्रुपिंग मध्येही या परिक्षेत किमान गुण घेणारे विद्यार्थीच प्रवेशासाठी पात्र ठरतात. मात्र या मार्गदर्शन केंद्राच्या विद्यार्थ्यांनी एकप्रकारे अतिशय अवघड असलेला हा डोंगर सहजरित्या सर केलेला आहे. परिक्षेतील या यशाबध्दल सर्व विद्यार्थ्यांचे तसेच त्यांना मार्गदर्शन करणारे अंगद मद्देवाड सर व पवन आरसेवाड सर यांचे पालक व शिक्षणप्रेमी नागरिकांतून अभिनंदन व कौतुक केले जात आहे.

## भारतीय संस्कृती ही वैश्विक आणि चिरंतन संस्कृती आहे -योगेश सोमण

माजलगाव । प्रतिनिधी

येथील श्री सिध्देश्वर शैक्षणिक संकुलात आयोजित प. पू. गोळवलकर गुरुजी व्याख्यानमालेचे पहिले पुष्प 'भारतीय संस्कृतीवरील आघात' या विषयावर बोलताना योगेशजी सोमण (राष्ट्रीय विचारवंत तथा प्रसिद्ध सिने अभिनेते, मुंबई) बोलत होते यावेळी त्यांनी सांगितले की, ब्रिटीशांनी सर्व प्रथम ऐतिहासिक व शौर्याचे प्रतिक असलेल्या गड- किल्ले उध्वस्त करून येथील संस्कृती चे पध्दतशीर खच्चीकरण केले, आज भारतीय संस्कृती वर आधूनिक तंत्रज्ञान, मोबाईल, चित्रपट, मालिका यांचा फार मोठा आघात सध्याच्या परिस्थितीत होत आहे परंतु समाजामध्ये आजही असे घटक आहेत जे पारंपरिक, वैचारिक कृतीतून संस्कृती चे जतन केले जात आहे. भारतीय संस्कृती ही अनादी काळापासूनची आहे. भारतीय संस्कृती ही वैश्विक व चिरंतन संस्कृती आहे.

या व्याख्यानमालेच्या पहिल्या पुष्पाची सुरुवात दीपप्रज्वलन व भारत माता, प. पू. गोळवलकर गुरुजी यांचे पूजन करून झाली. या सत्राचे अध्यक्ष भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेचे अध्यक्ष डॉ सुरेंद्र आलुरकर, व्याख्यानमाला समितीचे अध्यक्ष अभय कोकड तसेच केंद्रीय कार्यकारिणी सदस्य तथा श्री सिध्देश्वर शैक्षणिक संकुलाचे पालक प्रकाश दुगड, केंद्रीय कार्यकारिणी सदस्य अमरनाथ खुर्पे, श्री सिध्देश्वर शैक्षणिक संकुलाचे अध्यक्ष सुरेंद्र रेदासणी इत्यादी मान्यवर उपस्थित होते. या सत्राचे अध्यक्षीय समारोप करताना डॉ सुरेंद्र आलुरकर यांनी सांगितले की, भारतीय संस्कृती वर गेल्या अनेक शतकांपासून विविध आघात झाले आहे तरी भारतीय संस्कृती आज जगात पूजनीय आहे. प्रास्ताविक व्याख्यानमाला समितीचे कार्यवाह प्राचार्य डॉ मुकुंद देवर्षी यांनी केले. आभार प्रा. बाळासाहेब परळकर यांनी मानले तर सुत्रसंचालन प्रा. डॉ. रमेश गटकळ यांनी केले, वैयक्तिक पद्य श्रीमती नादमयी पोरे (कुलकर्णी) यांनी सांगितले. या पुष्पाची सांगता भारत मातेच्या आरतीने झाली. भारत माता आरती चैतन्य आहेर, कुणाल कुलकर्णी संगीत विभागाच्या चमुने सादर केली. यावेळी सर्व स्थानिक संस्था सभासद, माजलगाव शहरातील डॉक्टर, वकिल,पत्रकार, शैक्षणिक संकुलाचे माजी विद्यार्थी, पालक,महिला, पुरुष, नागरिक, सेवानिवृत्त शिक्षक तसेच माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक संतोष लिंबकर, प्राथमिक विद्यालयाच्या मुख्याध्यापिका श्रीमती सुमती भारती,सीबीएसई च्या श्रीमती वंदना मिटकरी, शिशुविहार च्या श्रीमती वर्षा कुलकर्णी,सर्व, प्राध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

## कागदपत्रे हरवले आहे

सतीश राधाकृष्ण दांगट रा. पेंडगाव ता. जि. बीड यांचे गट नंबर ३५ तरफ गिराम असे असलेले खरेदी खत दिनांक २८/०२/२०२६ रोजी पेंडगाव ते साक्षळपिंपरी प्रवासादरम्यान हरवले आहे सापडल्यास खालील नंबर वर संपर्क साधा

संपर्क : ९५११६७९९०५

मार्फत : ॲड एम आर उबाळे



राज्य लोकतंत्र
शेत-शिवार
गुरूवार दि.५ मार्च २०२६





# बांबू उद्योगाला प्रोत्साहन देण्यासाठी सरकारकडून उपाययोजना

## विधानसभेत वनमंत्री गणेश नाईक यांचे आश्वासन

मुंबई : राज्यातील बांबू उद्योगाला प्रोत्साहन देण्यासाठी सरकार विविध उपाययोजना करत असल्याची माहिती वनमंत्री गणेश नाईक यांनी बुधवारी (दि.०४) अर्थसंकल्पीय अधिवेशनात दिली. आमदार चेतन तुपे आणि शेखर निकम यांनी बांबू कारागिरांना विशेष दर्जा, संशोधन आणि स्वस्त दरात बांबू उपलब्ध करून देण्याबाबत प्रश्न उपस्थित केला होता. यावर सरकार बांबू लागवडीसाठी अनुदान, उद्योगांसाठी कर्ज आणि नव्या उत्पादनांना प्रोत्साहन देण्यासाठी योजना राबवत असल्याचे नाईक यांनी स्पष्ट केले. तसेच प्लास्टिकचा वापर टप्प्याटप्प्याने कमी करण्यासाठीही सरकार प्रयत्न करणार असल्याचे त्यांनी सांगितले.

सभागृहात बोलताना आमदार चेतन तुपे म्हणाले की, अटल बांबू योजना आणि राष्ट्रीय बांबू योजनेमुळे राज्यात बांबू लागवड वाढत आहे. लाभार्थ्यांची संख्या देखील वाढली आहे. मात्र या क्षेत्रावर पारंपारिकरित्या अवलंबून असलेल्या कारागिरांना प्लास्टिकच्या वाढत्या वापरामुळे मोठे नुकसान सहन करावे लागत आहे. बांबू उद्योगासाठी मोठ्या प्रमाणात नैसर्गिक कच्चा माल आवश्यक असतो, असेही त्यांनी नमूद केले. तुपे यांनी पुढे विचारले की, बांबूपासून तयार होणाऱ्या नव्या



उत्पादनांना प्रोत्साहन देण्यासाठी सरकार काही धोरण आणणार का? तसेच या उत्पादनांच्या संशोधनासाठी काही योजना आहे का? शिवाय बांबू कारागिरांना १ हजार ५०० दराने बांबू उपलब्ध करून देण्याबाबत सरकार विचार करणार का आणि या कारागिरांना विशेष दर्जा देण्याबाबत काय निर्णय आहे, असा सवाल त्यांनी केला. यावर शासनातर्फे उत्तर देताना वनमंत्री गणेश नाईक म्हणाले की, बांबू लागवडीसाठी सरकार एक हेक्टर क्षेत्रासाठी सुमारे सात लाख रुपयांपर्यंत अनुदान देते. काही काळापूर्वी एका चुकीच्या शासन निर्णयामुळे हे अनुदान दोन लाखांपर्यंत कमी झाले होते. मात्र नंतर त्यात सुधारणा करून पुन्हा सात लाखांपर्यंत वाढवण्यात आले आहे. राज्य सरकार बांबू बोर्डाच्या माध्यमातून विविध प्रकारची खेळणी आणि इतर वस्तू तयार करण्यासाठी योजना राबवत आहे. तसेच महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या माध्यमातून बांबू उद्योगासाठी स्वतंत्र योजना जाहीर करण्यात आली आहे. या योजनेत एका युनिटसाठी सुमारे दहा कोटी रुपयांपर्यंत कर्ज उपलब्ध होऊ शकते.

प्लास्टिकचा वापर टप्प्याटप्प्याने कमी करणार

प्लास्टिकच्या वाढत्या वापराबाबत विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना मंत्री नाईक म्हणाले की, सरकार टप्प्याटप्प्याने प्लास्टिकचा वापर कमी करण्यासाठी प्रयत्न करणार आहे. त्यामुळे पर्यावरणाचे संरक्षण होईल आणि बांबू उत्पादनांना अधिक मागणी मिळेल. आमदार शेखर निकम यांनी बांबूच्या विविध वापराबाबत विचारलेल्या प्रश्नावर नाईक म्हणाले की, फर्निचर तसेच इतर अनेक क्षेत्रांत बांबूचा वापर वाढवण्यासाठी सरकार प्रयत्न करणार आहे. त्यामुळे बांबू लागवड करणाऱ्या शेतकऱ्यांना अधिक फायदा होईल.

तसेच बांबूपासून पत्रावळी, द्रोण, पिण्याच्या पाण्याचे ग्लास यांसारखी उत्पादने तयार करण्यासाठी सरकार प्रोत्साहन देणार आहे. आदिवासी भागातील तरुणांना रोजगाराच्या संधी मिळाव्यात यासाठी तंत्रज्ञानावर आधारित प्रशिक्षण देणाऱ्या संस्था सुरू करण्याचाही सरकारचा विचार असल्याचे वनमंत्री गणेश नाईक यांनी सांगितले.

# खरिपाच्या पेरणीपूर्वी जमीनीची अशी करा तयारी



खरीप पिकांच्या पेरणीपूर्वी कोणत्या गोष्टींची काळजी घेणे आवश्यक आहे हे समजल्यास शेतकऱ्यांना याचा चांगला फायदा होतो. पावसाची चाहूल लागल्यानंतर खरिपाची तयारी करण्यास शेतकरी सुरूवात करतात.

पाचट जाळू नका : रब्बी पिकांच्या कापणीनंतर शेतातील पाचट जाळण्याकडे अनेक शेतकऱ्यांचा कल असतो. मात्र शेतातील पाचट हे जाळू नका. पाचट जळाल्याने पर्यावरणाचे देखील मोठे नुकसान होते. अशा परिस्थितीत चांगला पाऊस झाल्यावर शेताची नांगरणी रोटाव्हेटरने करावी. त्यामुळे पाचटाचे छोटे तुकडे तुटून पाऊस पडल्यानंतर ते शेतातच खत बनते.

भात रोपवाटिकेसाठी तयारी : भात रोपवाटिका बनवण्याचे कामही आता सुरू होणार आहे. अशा परिस्थितीत सुधारित बी-बियाणे, खते, तणनाशक व कीटकनाशके खरेदी करा. शेतात नांगरणी करून काही काळ राहू द्या. पावसानंतर पुन्हा नांगरणी करावी जेणेकरून उन्हापासून तण नष्ट होईल. यानंतरही रोपवाटिकेत तण राहिल्यास तण काढून टाका.

शेणखत आणि कंपोस्ट खत मिसळा : भात कापणीनंतर काही शेतात शेतकरी नांगरणी न करता मोहरी, वाटाणा, मसूर या पिकांची पेरणी करतात. मात्र यानंतर शेत खडबडीत असेल तर अशा शेतात सपाटीकरणाचे काम करावे, जेणेकरून शेतात कमी पाणी लागेल आणि चांगले पीक घेता येईल. जूनमध्ये पेरणी करावयाच्या पिकांसाठी शेताची नांगरणी करावी. पुन्हा नांगरणी करण्यापूर्वी शेतात शेणखत किंवा कंपोस्ट खत टाकून ते जमिनीत मिसळावे. यामुळे खताची शक्ती वाढेल आणि पिकाची वाढ आणि उत्पादन सुधारेल.

# वेस्ट डी कंपोजरने वाढेल शेतकऱ्यांचे उत्पन्न

शेती करीत असताना शेतकऱ्यांमध्ये रासायनिक खते आणि कीटकनाशके यांचा बेसुमार वापर वाढला आहे. त्यामुळे जमिनीचीही सुपीकता नष्ट होत चालली आहे. अशावेळी वेस्ट डिकंपोजर शेतीसाठी महत्त्वपूर्ण ठरू शकते.

काय आहे वेस्ट डिकंपोजर : वेस्ट डिकंपोजर हे गायीच्या शेणापासून उत्पादित केलेला द्रव पदार्थ आहे. त्यात सूक्ष्मजीव आढळतात जे पिकांचे अवशेष, शेण, सेंद्रिय कचरा खातात आणि झपाट्याने वाढतात आणि जमिनीत सेंद्रिय कार्बनचे प्रमाण वाढवतात.

जिथे हे ओतले जातात तिथे एक साखळी तयार होते, जे काही दिवसात शेण आणि कचरा कुजून कंपोस्टमध्ये तयार करतात. यामुळे जमिनीतील सेंद्रिय सेंद्रिय पदार्थांचे प्रमाण वाढते ज्यामुळे जमिनीची सुपीकता वाढते. जर ते जमिनीत टाकले तर ते जमिनीत असलेल्या हानिकारक रोग-जंतूंच्या संख्येवर नियंत्रण ठेवते. आणि जमीन निरोगी बनविण्यात मदत करते.

घरी तयार करण्याची पद्धत : २ किलो गुळ घ्या आणि २०० लिटर पाणी असलेल्या प्लास्टिकच्या ड्रममध्ये मिसळा.

आता १ बाटली कचरा विघटन



घ्या आणि त्यातील सर्व सामग्री गुळाचा ड्रम असलेल्या प्लास्टिकच्या ड्रममध्ये घाला. लाकडी काठीने ते मिश्रण व्यवस्थित मिसळा. ड्रमला कागद किंवा पुठ्ठ्याने झाकून ठेवा आणि दररोज एक किंवा दोनदा ढवळून घ्या. ५ दिवसांनंतर ड्रमचे द्रावण तयार होते. शेतकरी घरच्या घरी वेस्ट डी कम्पोजर तयार करू शकतात. वेस्ट डिकम्पोजरला थेट शेतात वापरण्यापूर्वी त्याचे कल्चर बनवले जाते.

वापरण्याची पद्धत : २० मिलीच्या कुपीपासून २०० लिटर द्रव खत तयार केले जाते, ते शेतात फवारले जाऊ शकते. शेण-कचऱ्यावर टाकून ते खत बनवता येते. याच्या मदतीने बियाणे शुद्ध करता येते.पिकावर बुरशीसारखे रोग असले तरी फवारणी करता येते. याशिवाय हिरवी मिरची, हळद, लसूण आणि आले यांच्या रसाची फवारणी करून कचरा कुजवल्यास पिकाचा रस शोषणाऱ्या किडींवर नियंत्रण मिळवता येते.यामुळे पीक उत्पादन तसेच शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढेल.

# टोमॅटोची लागवड कधी आणि कशी करावी!

टोमॅटो ही अतिशय लोकप्रिय भाजी आहे. टोमॅटोचा वापर भाज्यांची चव वाढवण्यासाठी केला जातो. टोमॅटो सॉस, चटणी, चाट बनवण्यासाठी याचा वापर मोठ्या प्रमाणात केला जातो. टोमॅटोमध्ये व्हिटॅमिन ए, व्हिटॅमिन सी, फायबर, लोह आणि कॅल्शियम यांसारखे अनेक पोषक घटक आढळतात, जे आरोग्यासाठी खूप फायदेशीर असतात. टोमॅटो चवीबरोबर शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवण्याचे काम करते. टोमॅटो लागवडीसाठी योग्य माती आणि हवामान

टोमॅटो पिकासाठी काळी चिकणमाती, वालुकामय चिकणमाती आणि लाल चिकणमाती माती योग्य आहे. हलक्या जमिनीतही टोमॅटोची शेती चांगली होते. टोमॅटोच्या उच्च उत्पादनासाठी मातीचे पीएच मूल्य ७ ते ८.५ दरम्यान असावे. टोमॅटोच्या सुधारित जातींची लागवड वर्षभर करता येते. त्यासाठी कोणत्याही विशिष्ट प्रकारची जमीन किंवा हवामान आवश्यक नसते. टोमॅटोच्या बिया उगवण्यासाठी २०-२५ अंश तापमान योग्य असते. १८-३० अंश तापमान टोमॅटोच्या चांगल्या वाढीसाठी योग्य आहे.

टोमॅटोच्या सुधारित जाती टोमॅटोच्या लागवडीसाठी टोमॅटोच्या चांगल्या जातींचे बियाणे निवडणे अत्यंत आवश्यक आहे. यासाठी तुम्ही बाजारातून किंवा कृषी विज्ञान केंद्रातून अधिक माहिती मिळवू शकता. टोमॅटोचे देशी वाण: पुसा शीतल पुसा-१२०, पुसा रुबी, पुसा गौरव, अर्का विकास, अर्का सौरभ, इत्यादी टोमॅटोचे देशी वाण आहेत. हायब्रीड जातीमध्ये: पुसा संकर-१, पुसा संकर-२, पुसा संकर-४, रश्मी आणि अविनाश-२.

टोमॅटो लागवड करण्याची वेळ : टोमॅटोचे पीक वर्षातून ३ वेळा घेता येते. त्यासाठी मे-जून, सप्टेंबर-ऑक्टोबर आणि जानेवारी-फेब्रुवारीमध्ये



लागवड केली जाते.

लागवडीची पद्धत : टोमॅटोच्या लागवडीसाठी शेतात तुम्ही रोपवाटिका तयार करू शकता. नर्सरी पद्धतीने टोमॅटोची लागवड केल्यास अधिक उत्पादन मिळते. लागवडीपूर्वी शेतीची मशागत : टोमॅटोची लावणी करण्यापूर्वी शेतात उत्तम प्रकारे नांगरणी करावी. पहिली नांगरणी केल्यानंतर योग्य ते खत आणि कंपोस्ट जमिनीत मिसळून पुन्हा एकदा नांगरणी करावी म्हणजे खत व कंपोस्ट जमिनीत चांगले मिसळतात.

तण नियंत्रण : तण पिकातील पोषक घटक शोषून घेतात त्यामुळे पीक कमकुवत होते आणि उत्पादनाचे मोठे नुकसान होते. पर्यायाने पिकाची वाढ थांबते. त्यामुळे तण नियंत्रणासाठी वेळोवेळी तण काढणे आवश्यक आहे. बथुआ, सेंजी, कृष्णनिल, सातपाटी यांसारखे रुंद पानांचे तण शेतात जास्त असल्यास स्टॅम्प-३० ची फवारणी करा. यामुळे तणांचे मोठ्या प्रमाणात नियंत्रण होऊ शकते.

खत व्यवस्थापन : टोमॅटोच्या अधिक उत्पादनासाठी खतांचा वापर करण्यापूर्वी, शक्य असल्यास, आपल्या शेतातील मातीची चाचणी घ्यावी. त्यानंतरच खत वापरावे. तसे, टोमॅटो लागवडीसाठी पेरणीपूर्वी कुजलेले खत, डीएपी, अमोनियम सल्फेट, म्युरेट ऑफ पोटॅश शेतात शिंपडा.

सिंचन व्यवस्थापन : जमिनीतील ओलाव्याच्या आधारावर सिंचन आवश्यक आहे. पहिले पाणी फुले येण्यापूर्वी व दुसरे पाणी टोमॅटो तयार होण्याच्या वेळी द्यावे. हलके पाणी द्यावे व शेतात पाणी साचणार नाही याची काळजी घ्यावी. टोमॅटोमध्ये तापमान सहन करण्याची क्षमता चांगली असते. त्यामुळे वारंवार पाणी देण्याची गरज नाही.

टोमॅटोची काढणी : टोमॅटोची वाढ पूर्ण झाल्यावर आणि लाल व पिवळे पट्टे दिसू लागल्यावर, टोमॅटोची तोडणी करण्यास काही हरकत नाही. तोडल्यानंतर टोमॅटो कोरड्या मध्यम गरम हवेच्या सानिध्यात ठेवावेत.

टोमॅटो रोग आणि प्रतिबंध : बुरशीजन्य रोग हा रोग टोमॅटोच्या रोपांमध्ये बियाणे उगवण्यापूर्वी आणि बियाणे उगवल्यानंतर दिसून येतो. यामध्ये झाडांच्या बिया आणि जमिनीला जोडलेले भाग कुजतात. हा रोग टाळण्यासाठी पायथियम, फायटोफथोरा, स्क्लेरॅकमची फवारणी करावी. करपा - टोमॅटोच्या लागवडीत किंवा रोगामध्ये झाडांवर लहान ठिपके दिसतात आणि पाने पिवळी पडतात. त्याच्या निदानासाठी अल्टरनेरिया सोलानीची फवारणी करावी. लेट ब्लाइट - या रोगात झाडाच्या आजूबाजूला तपकिरी पावडरीचे थेंब दिसतात, ते रोखण्यासाठी फायटोफथोरा इनसेन्सची फवारणी करावी. फळ कुजणे- फळ कुजणे टोमॅटोच्या झाडावर आल्यानंतर होते, ज्यामध्ये फळांवर पिवळे ठिपके दिसतात आणि पीक खराब होते, त्याच्या निदानासाठी पॅरासिटिकाची फवारणी करा. मोझॅक- हा रोग टोमॅटोच्या लागवडीत आढळतो. जेव्हा हा रोग होतो तेव्हा झाडाची पाने आकुंचन पावतात, पानावर आकडी येते. ते टाळण्यासाठी सल्फरची फवारणी करावी.

टोमॅटो लागवडीतील खर्च, उत्पन्न आणि नफा : टोमॅटोची लागवड वर्षभर करता येते. जर तुम्ही रोपवाटिका तयार करून चांगल्या प्रतीच्या टोमॅटोची लागवड केली तर वर्षभरात तुम्हाला एकरी सुमारे ५ ते ६ लाखांचा नफा मिळू शकतो. याशिवाय सॉस, चटण्या, लोणचे, असे पदार्थ बनवण्याचे काम केले तर तुमच्या उत्पन्नात नक्कीच वाढ होईल.




### महत्वाच्या घटना

१७९१ : स्मॉंट हे अमेरिकेचे १४ वे राज्य बनले.
१८६१ : अब्राहम लिंकन अमेरिकेचे १६ वे अध्यक्ष झाले
१८३६ : शिकागो शहराची स्थापना झाली.
१८८२ : ब्रिटन मधील पहिली इलेक्ट्रिक ट्राम पूर्व लंडन मध्ये सुरु.
१९३६ : हिंडेनबर्गरचे पहिले उड्डाण झाले.
१९५१ : आशियायी सामन्यास प्रारंभ झाला.
१९६१ : भारतीय नौदलात १ ले विमानवाहू जहाज 'विक्रांत' दाखल झाले.
१९७४ : पिपल मॅगझिन चे पहिले प्रकाशन झाले.
१९८० : प्रचंड बहुमताने निवडणुका जिंकून रॉबर्ट मुगाबे हे झिम्बाब्वेचे पहिले कृष्ण्वर्णीय पंतप्रधान बनले.
१९८४ : महाराष्ट्रात वीजनिर्मितीचा नवा विक्रम याच दिवशी झाला.
१९९६ : चित्रकार रवी परांजपे यांना केंग हॉल ऑफ फेम हा राष्ट्रीय स्तरावरील पुरस्कार जाहीर.
२००१ : पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांच्या हस्ते गुरुदासपूर येथील रणजितसागर धरण देशाला अर्पण केले.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८६८ : चलत चित्रपटाचे प्रवर्तक हरिश्चंद सखाराम भाटवडेकर यांचा जन्म.
१८९३ : पायोनियर इन्स्ट्रुमेंट कंपनी चे सहसंस्थापक चार्ल्स हर्बर्ट कॉल्विन यांचा जन्म. (मृत्यू: ४ मार्च १९८५)
१९०६ : फिशर इलेक्ट्रॉनिक्स चे निर्माते एवेरी फिशर यांचा जन्म. (मृत्यू: २६ फेब्रुवारी १९९४)
१९२२ : दीना पाठक, गुजराती व हिंदी अभिनेत्री.
१९२६ : ॲमवे चे सहसंस्थापक रिचर्ड डेवोस यांचा जन्म.
१९३५ : काँग्रेसच्या नेत्या प्रभा राव यांचा जन्म.
१९७३ : भारतीय दिग्दर्शक आणि पटकथालेखक चंद्र शेखर येलेती यांचा जन्म.
१९८० : भारतीय टेनिस खेळाडू रोहन बोपन्ना यांचा जन्म.
१९८६ : इंस्टाग्राम चे सहसंस्थापक माईक क्रीगेर यांचा जन्म.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१८५२ : रशियन नाटककार आणि कथा कादंबरीकार निकोलय गोगोल यांचे निधन.
१९१५ : ब्रिटिश समर टाईम चे निर्माता विल्यम विल्लेत यांचे. (जन्म: १० ऑगस्ट १८५६)
१९२५ : रवीन्द्रनाथ टागोर यांचे मोठे भाऊ बंगाली साहित्यिक आणि चित्रकार ज्योतीन्द्रनाथ टागोर यांचे निधन. (जन्म: ४ मे १८४९ कोलकाता, पश्चिम बंगाल)
१९४८ : बाळकृष्ण शिवराम मुंजे - भारतीय मराठी राजकारणी, हिंदू महासभेचे संस्थापक.
१९५२ : नोबेल पारितोषिक विजेते ब्रिटीश जैवरसायन शास्त्रज्ञ सर चार्ल्स शेरिंग्टन यांचे निधन. (जन्म: २७ नोव्हेंबर १८५७ आयलिंग्टन, लंडन, इंग्लंड)
१९७१ : कोकणचे गांधी आप्पासाहेब पटवर्धन
१९७६ : जर्मन भौतिकशास्त्रज्ञ वॉल्टर शॉटकी यांचे निधन. (जन्म: २३ जुलै १८८६)
११८१ : टोरिन थॅचर - भारतीय अभिनेता.
१९८५ : साहित्यिक डॉ. पु. ग. सहस्रबुद्धे यांचे निधन.
१९९२ : सकाळ च्या प्रकाशिका आणि सकाळ पेपर्स प्रा. लि. च्या संचालिका शांताबाई परूळेकर यांचे निधन.
१९९५ : चरित्र अभिनेता इफ्तिखार (जन्म: २२ फेब्रुवारी १९२०)
१९९७ : अमेरिकन भौतिकशास्त्रज्ञ रॉबर्ट इह. डिक यांचे निधन.
१९९९ : भारतीय विमानोड्डाणाचा पाया घालणारे, एअर इंडियाचे पहिले कर्मचारी विठ्ठल गोविंद गाडगीळ यांचे निधन.
२००० : स्वातंत्र्य सेनानी, कम्युनिस्ट पक्षाच्या नेत्या, लोकसभा सदस्य गीता मुखर्जी (जन्म: ८ जानेवारी १९२४)
२००७ : सुनील कुमार महातो - भारतीय संसद सदस्य.
२०११ : केन्द्रीय मानव संसाधन मंत्री, ३ वेळा मध्यप्रदेशचे मुख्यमंत्री आणि पंजाबचे राज्यपाल अर्जुनसिंग यांचे निधन. (जन्म: ५ नोव्हेंबर १९३०).

# उन्हाळ बाजरी, भुईमुंगातील आंतरमशागत आणि तण नियंत्रण



उन्हाळी भुईमूग आणि बाजरी पिकाचे उत्कृष्ट व्यवस्थापन करण्यासाठी फेब्रुवारीच्या पहिल्या आठवड्यापर्यंत पेरणी पूर्ण केली जाते. यानंतर पिके वाढीच्या अवस्थेत असताना आंतरमशागत आणि ताण नियंत्रण करणे गरजेचे ठरते.

भुईमुगातील तण व्यवस्थापन : भुईमुगातील कार्यक्षम तण व्यवस्थापनाकरीता पेरणीनंतर लगेच पेंडीमेथालिन १.०० किलो क्रि. घ. प्रति हेक्टरी १० लि. पाण्यातून ओलीवर फवारणी करावी. तसेच पेरणीनंतर तणांच्या बंदोबस्तासाठी २०-२५ दिवसांनी परसूट किंवा टरगासुपर १५ मिली व्यापारी उत्पादन / हे. १० लिटर पाण्यातून द्यावे. पेरणी नंतर चाळीस दिवसापर्यंत पीक तणविरहित ठेवावे. त्यासाठी वेळोवेळी कोळपणी व खुरपणी करावी. पेरणी नंतर ओळीत अंतर आढळून आल्यास बी टाकून तावडतोब नांगे भरावेत.

बाजरीतील आंतरमशागत व तण नियंत्रण : पेरणीपासून सुरवातीचे ३० दिवस शेत तण विरहित ठेवणे गरजेचे असते. याच कालावधीत तण व पिकामध्ये हवा, पाणी, अन्नद्रव्ये आणि सूर्यप्रकाश मिळविण्यासाठी स्पर्धा होत असते. दोनवेळा कोळपणी व गरजेनुसार दोनवेळा खुरपणी करावी. मजूरटंचाई असल्यास, पेरणीनंतर परंतु पीक उगवणीपूर्वी अँट्राझिन (५० डब्ल्यूपी) ४०० ग्रॅम प्रति एकरी प्रति २०० लिटर पाण्यात मिसळून जमिनीवर सम प्रमाणात फवारणी करावी.

दैनिक
राज्य लोकतंत्र



# सांगवीतील 'चांदीचा खजिना' तहसीलकडे

## शेकडो नाणी गायब ? केवळ २५० नाणी जप्त ; घटनास्थळ सील करण्याची ग्रामस्थांची मागणी

**शरद रेडेकर । आष्टी**

आष्टी तालुक्यातील सांगवी (पाटण) येथे सापडलेल्या चांदीच्या ऐतिहासिक नाण्यांचा मुद्दा सध्या तालुक्यात चर्चेचा विषय ठरला आहे. घराच्या बांधकामासाठी काढलेल्या मातीमध्ये सापडलेली नाणी प्रशासनाने जप्त करून तहसील कार्यालयात जमा केली असली, तरी मोठ्या प्रमाणावर नाणी गायब झाल्याच्या चर्चेमुळे संशयाचे वातावरण निर्माण झाले आहे.



शनिवारी शशिकांत खुटाळे यांच्या घराच्या बांधकामासाठी काढलेल्या मातीच्या ढिगाऱ्यात काही मुलांना चांदीची नाणी आढळली. या घटनेची माहिती मिळताच रविवारी कडा पोलिस चौकीचे अधिकारी व महसूल विभागाचे पथक घटनास्थळी दाखल झाले. पंचनामा करून २५० नाणी जप्त करण्यात आली. सोमवारी ही नाणी तहसीलदारांच्या ताब्यात देण्यात आली असून पुढील तपासासाठी ती पुरातत्व विभागाकडे पाठविण्यात येणार आहेत.

मात्र, प्रत्यक्षदर्शींच्या मते घटनास्थळी नाण्यांचा साठा मोठ्या प्रमाणावर होता. काही ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार ४ ते ५ किलो वजनाची नाणी सापडली होती. त्यामुळे जप्त करण्यात आलेल्या २५० नाण्यांचा आकडा कमी असल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. शनिवारी रात्री पुन्हा खोदकाम झाल्याची चर्चा असून, त्यावेळी काही नाणी लंपास झाल्याचा आरोप ग्रामस्थांकडून होत आहे. दरम्यान, या जागेवर अजूनही नाणी असण्याची शक्यता नाकारता येत नसल्याने ती जागा तात्काळ सील करावी, गायब नाण्यांचा शोध घेण्यासाठी संबंधितांची चौकशी करावी आणि शास्त्रोक्त उत्खनन भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण किंवा राज्य पुरातत्व विभागामार्फत करावे, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

तहसील प्रशासनाने जप्त नाणी सुरक्षित ठेवल्याचे सांगितले असून, पुरातत्व विभागाच्या अहवालानंतरच या नाण्यांचा ऐतिहासिक कालखंड व नेमके महत्त्व स्पष्ट होणार आहे. मात्र, 'चांदीच्या खजिन्या'भोवतीचे गूढ कायम असल्याने तालुक्यात उत्सुकता आणि संशयाचे वातावरण आहे.

# मदनबाई लोढा यांचे संथारा व्रतामध्ये निधन

## शोकाकुल वातावरणात मोंढा स्मशानभूमीत अंत्यसंस्कार

बीड । प्रतिनिधी

माजी आमदार स्व. चांदमल लोढा यांच्या धर्मपत्नी श्रीमती मदनबाई चांदमल लोढा (वय ८९) यांना ३ मार्च मंगळवार रोजी रात्री साडे आठ वाजेदरम्यान संथारा व्रतामध्ये वीरमरण प्राप्त झाले. त्यांच्या पार्थिवावर ४ मार्च बुधवारी मोंढा रोडवरील अमरधाम येथे अत्यंत शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले.



स्व. मदनबाई लोढा यांची अंत्ययात्रा सकाळी १०:३० वाजता जालना रोडवरील गणेश हाउसिंग सोसायटीमधील अशोक लोढा यांच्या निवासस्थानापासून निघाली. त्यांच्यावर मोंढा स्मशानभूमी मध्ये अत्यंत शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी बीड शहरातील मान्यवर नेते, सामाजिक कार्यकर्त्यांनी श्रद्धांजली वाहिली. यावेळी आप्तेष्ट, नातेवाईक, मित्रपरिवार, समाजातील सर्व क्षेत्रातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. दिवंगत मदनबाई लोढा यांच्या पश्चात तीन मुले एक मुलगी (पुष्पा संदीप भंडारी, पुणे), सुना, नातवंडे, पतवंडे असा परिवार आहे. सामाजिक कार्यकर्ते प्रेमचंद (बाबुशेठ) लोढा, स्व. सतीश लोढा, दिलीपचंद लोढा, भाजपचे शहराध्यक्ष अशोक लोढा यांच्या त्या मातोश्री होत. लोढा परिवाराच्या दुःखात दैनिक राज्य लोकतंत्र परिवार सहभागी आहे.

# निबंधक कार्यालयात सरकारी कागदपत्रांची नासधुस ; आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी येथील निबंध कार्यालयात शासकीय कागदपत्रे फाडून नुकसान केल्याप्रकरणी आरोपीविरुद्ध अदखलपात्र गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेमुळे कार्यालयीन कामकाजात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.

फिर्यादी घनश्याम कृष्णा खेडसकर (वय ५४), सहाय्यक दुय्यम निबंधक, निबंध कार्यालय आष्टी, यांनी दिलेल्या तक्रारीनुसार ते मागील तीन वर्षांपासून दुय्यम निबंधक म्हणून कार्यरत आहेत. दिनांक २७ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी १२.२० वाजता दस्त क्रमांक ७६३/२०२६ ची नोंदणी प्रक्रिया सुरू असताना लिहून देणारे पंकज सतीश बोरा, रा. ए-४ पिनाक गार्डन, कोथरूड, जिल्हा पुणे व त्यांच्यासोबत एक अज्ञात इसम कार्यालयात आले.

यावेळी किरकोळ कारणावरून कार्यालयात अचानक वाद निर्माण झाला. त्यानंतर सोबत आलेला अज्ञात इसम तेथून निघून गेला. दरम्यान, संतापाच्या भरात पंकज सतीश बोरा यांनी टेबलावर स्कॅनिंगसाठी ठेवलेले दस्त क्रमांक ७४९/२०२६ चे शासकीय नोंदणीकृत कागदपत्र फाडून टाकले व ते कागदपत्र घेऊन कार्यालयातून निघून गेले, अशी तक्रार फिर्यादीने दिली आहे. सरकारी दस्तऐवजांची तोडफोड व नुकसान केल्याप्रकरणी आरोपी पंकज सतीश बोरा व त्याच्या सोबत असलेल्या अज्ञात इसमाविरुद्ध अदखलपात्र गुन्हा नोंद करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस हवालदार तागड हे करीत आहेत.

# योगेश्वरी वधू वर सूचक मंडळाच्या अंकात नोंदणी करण्याचे आवाहन

अंबाजोगाई । प्रतिनिधी

येथील योगेश्वरी वधू वर सूचक मंडळाच्या गुढीपाडवा अंकाचे लवकरच प्रकाशन होणार असून इच्छुक वधू-वर व त्यांच्या पालकांनी ०७ मार्च शनिवार पर्यंत आपली माहिती व शुल्क द्यावे असे आवाहन मंडळाचे अध्यक्ष प्रभाकर सेलमुकर यांनी केले आहे. गेल्या अनेक वर्षा पासून या वधु - वर मंडळाचे पदाधिकारी निष्ठेने काम करत असून या मंडळाच्या माध्यमातून अनेक विवाह जुळून आले आहेत. गुढी पाडवा निमित्त अंक लवकरच प्रकाशित होणार असून या अंकासाठी पालकांनी इच्छुक वधु - वरांनी आपली योग्य माहिती व शुल्क द्यावे अधिक माहितीसाठी ९८६०३४७४२७, ९४२००३३४९८, ९४२१३४५४६५ या भ्रमणध्वनीवर संपर्क साधावा असे आवाहन बाबुराव बाभुळगांवकर, श्रीपाद चिक्षे, अशोकराव टाकळकर, श्रीराम हिवरेकर, मुकुंद घाटे, राहूल देशपांडे, सौ.राजश्री पिंपळे, सौ.स्मिता भातलवंडे, सौ. कल्याणी कुलकर्णी आदी संचालकांसह अशोक पांडव, चंद्रकांत जोशी(बीड), सुधीर देशमुख (कडा), अशोक पोतदार (लातुर) आदींनी केले आहे.

# सचिन जाधवर आत्महत्या प्रकरण फरार आरोपी प्रदिप फाटे यास अटक

**बीड । प्रतिनिधी**

**जीएसटी अधिकारी सचिन जाधवर यांच्या संशस्यास्पद मृत्यू प्रकरणी गुन्हा दाखल झालेले वरिष्ठ अधिकारी प्रदीप फाटे यांना पुणे जिल्ह्यातील लोणीकंद परिसरातून गुन्हे अन्वेषण शाखेने ताब्यात घेतले. त्यांना ग्रामीण पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे.**

पोलीस स्टेशन बीड ग्रामीण येथे गु.र.न २६/२०२६ कलम १०८,३५१(२), ३५२ भा.न्या. सं प्रमाणे गुन्हा दाखल होता. सदर गुन्हयातील मुख्य आरोपी प्रदिप फाटे हा गुन्हा घडल्यापासुन फरार झाला होता. सदर आरोपीचा शोध बीड ग्रामीण पोलीस करत होते. परंतु सदर आरोपी हा सातत्याने गुंगारा देत होता. सदर आरोपीचा शोध घेवुन त्यास अटक करण्याबाबत पोलीस अधिक्षक नवनित कॉवत यांनी पो.नि. शिवाजी बंटेवाड यांना आदेश दिले होते. यावरुन पो.नि.शिवाजी बंटेवाड यांनी पोलीस उपनिरीक्षक महेश विघ्ने यांचे एक पथक तयार केले होते. सदर आरोपीचा शोध स्था.गु.शा पथकाने सुरु केला. तांत्रीक विश्लेशन व गोपनिय माहीतेचे आधारे सदर आरोपी हा पुणे लोणीकंद येथील त्याचे नातेवाईक यांचे घरी राहत असल्याची खात्रीशीर माहीती प्राप्त झाली. यावरुन स्था.गु.शा पथक पुणे येथे रवाना झाले व आरोपी प्रदिप फाटे यास पुणे लोणीकंद येथुन ताब्यात घेतले. त्यास पुढील कारवाई कामी पो.स्टे. बीड ग्रामीण पोलीसांचे स्वाधीन करण्यात आले आहे.सदरची कामगिरी ही मा. नवनीत कॉवत, पोलीस अधिक्षक अधिक्षक बीड, मा. अपर पोलीस अधिक्षक सचिन पांडकर यांचे मार्गदर्शनाखाली पो.नि.शिवाजी बंटेवाड, सपोनि दराडे, पोउपनि महेश विघ्ने, पोहवा अशोक दुबाले,, चापोहवा मराडे, यांनी केली आहे.

# राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धेचे बीडमध्ये आयोजन

## उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांच्या अध्यक्षतेखालील बैठकीत निर्णय

**मुंबई । प्रतिनिधी**

यंदाच्या छत्रपती शिवाजी महाराज चषक राज्यस्तरीय हॉलीबॉल स्पर्धा अंबरनाथ येथे, छत्रपती शिवाजी महाराज चषक राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धा नागपूर येथे, स्वर्गीय खाशाबा जाधव चषक राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धा बीड येथे तसेच कै. भाई नेरुरकर चषक राज्यस्तरीय खो-खो स्पर्धा बारामती येथे आयोजित करण्याचा निर्णय आज घेण्यात आला. उपमुख्यमंत्री तथा क्रीडा व युवक कल्याण मंत्री सुनेत्रा अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला.



सन २०२५-२६ या वर्षात विविध राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धांच्या आयोजनाबाबत सह्याद्री राज्य अतिथीगृह येथे उपमुख्यमंत्री तथा क्रीडा व युवक कल्याण मंत्री सुनेत्रा अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली बैठक आयोजित करण्यात आली होती. यावेळी क्रीडा विभागाचे प्रधान सचिव संजय खंदारे, उपमुख्यमंत्र्यांचे सचिव डॉ. राजेश देशमुख, क्रीडा व युवक कल्याण विभागाच्या आयुक्त शीतल तेली-उगले यांच्यासह कबड्डी, कुस्ती, हॉलीबॉल व खो-खो या खेळांच्या संघटनांचे पदाधिकारी उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार म्हणाल्या की, राज्यातील क्रीडा संस्कृतीला चालना देण्यासाठी आणि युवा खेळाडूंना व्यापक व्यासपीठ उपलब्ध करून देण्यासाठी विविध राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात येते. राज्यातील क्रीडा क्षेत्र सक्षम करण्यासाठी अशा स्पर्धांचे आयोजन अत्यंत महत्त्वाचे आहे. ग्रामीण व शहरी भागातील खेळाडूंना समान संधी मिळावी, त्यांना दर्जेदार सुविधा उपलब्ध व्हाव्यात आणि राष्ट्रीयस्तरावर चमक दाखविण्यासाठी आवश्यक व्यासपीठ मिळावे, यासाठी शासन कटिबद्ध असल्याची ग्वाही त्यांनी दिली. राज्यस्तरीय स्पर्धांमुळे नवोदित खेळाडूंना आपली गुणवत्ता सिद्ध करण्याची संधी मिळणार असून क्रीडा क्षेत्रात स्पर्धात्मक वातावरण निर्माण होईल. यामुळे महाराष्ट्राची समृद्ध क्रीडा परंपरा अधिक बळकट होऊन राज्याला भविष्यात अधिक राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय दर्जाचे खेळाडू मिळतील, असा विश्वास उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी व्यक्त केला.

# चंकलांबा प्रभाग समन्वयकांचे काम म्हणजे मला पहा अन् फुलं वहा

मादळमोही । प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान अंतर्गत महिला सक्षमीकरण व सबलीकरण शासन भर देत असतानाच गेवराई तालुक्यातील चंकलंबा प्रभाग समन्वयक मात्र प्रसार माध्यामावर काम न करताच वृतपत्रात बातम्या देवून स्वताची पाठ थोपट्यांनाचा केविलवाणी प्रयत्न करत आहेत,त्यांचे काम म्हणजे मला पहा फुलं वहा असं झाले आहे.महिला बचत गटाच्या माध्यमातून ग्रामीण महिलाना आर्थिक सबलीकरणासाठी मोठे काम केले जाते, परंतु चंकलंबा प्रभाग समन्वयक हे शासनाने ठरवून दिलेले काम न करता महिला बचत गटात भांडणे लावण्याचा उद्योग करत आहेत.

### समन्वयकांची तात्काळ चौकशी करा

चंकलंबा प्रभागात महिला बचत गट न वाढविता वेगळे कुटाणे करुण काम करण्याचा आव दाखवणे म्हणजे सरकार सह अधिकारी यांना घोर फसवणूक करणे कितपत योग्य यांची चौकशी करावी अशी मागणी महिलांनी केली आहे.

बचत गट स्थापन करण्यासाठी गांव फेरी, गांव नकाशा, मशाल फेरी, द्रारिद्र रेषा खालील कुंटुबाचा सर्वह, ग्राम संघ स्थापन करण्यासाठी सहकार्य करणे, ग्रामपंचायत स्तरावर महिला पदाधिकारी यांच्या सोबत बैठका घेणे, गटातील महिलाचा आर्थिक स्तर उंचावण्यासाठी शासनाच्या कल्याण कारी योजना महिला गटातील सदस्य पर्यंत पोहचवणे, हे कामे सोडून देवून महिलांना एकमेव विरोधात भडकावणे अशी कामे केली जातात, चंकलंबा प्रभागातील अनेक गावे, वाड्या तांड्यावर न गेल्यामुळे अनेक गांवात वाड्या व तांड्यावर महिला बचत गट स्थापन करून आर्थिक स्तर उंचावुन,महिलाचा गांव कारभारात सहभाग वाढवणे हे प्रमुख उद्देश आसतानाही काम न करता, खोट्या बातम्या देवुन शासन व वरिष्ठ अधिकारी यांच्याकडून होणाऱ्या कारवाई पासुन पळ काढण्याचा प्रयत्न केला जात आहे, मात्र चंकलंबा प्रभाग समन्वयक काम न करता लोकशाहीच्या चौथा आधारस्तंभ असणाऱ्या पत्रकारांना बदनाम करण्याचा केविलवाणी प्रयत्न प्रभाग समन्वयक कडुन नाहक केला जात तरी सीईओ साहेब तात्काळ हकालपट्टी करुन चांगला प्रभाग समन्वयक यांनी नियुक्ती करुन रखडलेल्या कामांना गती देण्यात यावी,

# बीड जिल्ह्यात इंधन तुटवडा नसल्याचे प्रशासनाचे स्पष्टीकरण

बीड । प्रतिनिधी

आखाती देशातील काही भागात निर्माण झालेल्या युद्धाच्या तणावपूर्ण परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर बीड जिल्ह्यात इंधन तुटवडा निर्माण झाल्याची अफवा काही ठिकाणी पसरत असल्याचे निदर्शनास आले आहे.

### अफवांवर विश्वास न ठेवण्याचे प्रशासनाचे आवाहन

या पार्श्वभूमीवर जिल्हा प्रशासनाने नागरिकांना आवाहन करत स्पष्ट केले आहे की, जिल्ह्यात पेट्रोल व डिझेलचा पुरेसा साठा उपलब्ध असून इंधन पुरवठा सुरळीत सुरू आहे. अफवांमुळे काही पेट्रोल पंपांवर वाहनधारकांनी अतिरिक्त इंधन साठवण्यासाठी गर्दी केल्याचे दिसून आले. मात्र, जिल्ह्यात कोणत्याही प्रकारचा इंधन तुटवडा नसून सर्व पेट्रोल पंपांवर नियमितपणे इंधन पुरवठा केला जात आहे. त्यामुळे नागरिकांनी अफवांवर विश्वास न ठेवता अनावश्यक गर्दी टाळावी, असे आवाहन प्रशासनाने केले आहे. सर्व पेट्रोल पंप कंपनीचे विक्री अधिकारी व प्रतिनिधींना इंधन पुरवठा सुरळीत ठेवण्याबाबत आवश्यक त्या सूचना देण्यात आल्या आहेत. चुकीची माहिती पसरविणाऱ्यांविरुद्ध कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असा इशाराही प्रशासनाने दिला आहे. नागरिकांनी संयम बाळगून प्रशासनास सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हा पुरवठा अधिकारी बीड यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे केले आहे.

# भूमी अभिलेख कर्मचाऱ्यांच्या आंदोलनामुळे जिल्ह्यात कामकाज ठप्प

बीड । प्रतिनिधी

जिल्ह्यातील भूमी अभिलेख विभाग अंतर्गत कार्यरत कर्मचाऱ्यांनी विविध प्रलंबित मागण्यांसाठी टप्प्याटप्प्याने आंदोलन छेडण्याचा निर्णय घेतला आहे. या आंदोलनामुळे शेतकरी तसेच सामान्य नागरिकांची मोजणी, हद्दकायाम, फेरफार व इतर तांत्रिक कामे मोठ्या प्रमाणात प्रभावित होण्याची शक्यता आहे.



भूमी अभिलेख विभाग हा पूर्णतः तांत्रिक स्वरूपाचा विभाग असूनही कर्मचाऱ्यांच्या वेतनश्रेणी, प्रवासभत्ता, आकृतीबंध तसेच प्रशासकीय निर्णयांबाबत शासनाकडून दीर्घकाळापासून दुर्लक्ष होत असल्याचा आरोप कर्मचाऱ्यांनी केला आहे. यासंदर्भात अनेक वेळा निवेदने देऊनही मागण्यांवर कोणतीही ठोस कार्यवाही करण्यात आलेली नाही. यामुळे कर्मचाऱ्यांनी आंदोलनाची टप्प्यावार रूपरेषा जाहीर केली आहे. त्यानुसार दिनांक १८ व २० फेब्रुवारी २०२६ रोजी मोजणी साहित्य कार्यालयात जमा करून मोजणी काम पूर्णतः बंद ठेवण्यात येणार असून कार्यालयीन कामकाज काळ्या फिती लावून करण्यात येणार आहे. त्यानंतर दिनांक २३ ते २७ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत सामूहिक अर्जित रजा घेऊन असहकार आंदोलन करण्यात येणार आहे.

तसेच दिनांक २७ फेब्रुवारी २०२६ रोजी जमाबंदी आयुक्त व संचालक भूमि अभिलेख महाराष्ट्र राज्य पुणे कार्यालयावर आक्रोश मोर्चा काढून धरणे आंदोलन करण्यात येणार आहे. यानंतरही मागण्यांची दखल न घेतल्यास दिनांक ०२ मार्च २०२६ पासून बेमुदत कामबंद आंदोलन करण्याचा इशारा कर्मचाऱ्यांनी दिला आहे. ◀◀ पान ३ वर



।। श्री मन्मथस्वामी प्रसन्न ।। रजि. नं. ए-९८६

श्री मन्मथस्वामी देवस्थान पंच कमेटी

श्रीक्षेत्र कपिलधार, ता.जि.बीड-431122

जाहीर सूचना

संत शिरोमणी मन्मथस्वामी देवस्थान पंचकमिटी, श्री क्षेत्र कपिलधार (ता. जि. बीड) यांच्यामार्फत कळविण्यात येते की, संत शिरोमणी मन्मथस्वामी देवस्थान मंदिर परिसर व देवस्थानच्या मालकीच्या हद्दीत कोणत्याही प्रकारचे विवाह सोहळे आयोजित करणे, अनधिकृत बांधकाम करणे, तसेच बेकायदेशीर बॅनर, पोस्टर, फलक किंवा जाहिरात साहित्य लावणे यास सक्त मनाई करण्यात येत आहे. सदर निर्णय देवस्थान परिसराची पावित्र्यता, सुव्यवस्था व कायदेशीर हक्क अबाधित राखण्यासाठी घेण्यात आलेला आहे. यापुढे नमूद मनाई आदेशाचे उल्लंघन करणाऱ्या व्यक्ती, संस्था किंवा संबंधितांविरुद्ध लागू कायद्यांनुसार दंडात्मक व कायदेशीर कारवाई करण्यात येईल. याची सर्वांनी गांभीर्याने नोंद घ्यावी.

स्वाक्षरीत/अध्यक्ष
श्री मन्मथस्वामी देवस्थान पंच कमेटी
श्री क्षेत्र कपिलधार, ता. जि. बीड 431122

# मोटरसायकल अपघातात रितेश दहातोंडे यांचे निधन

कडा । प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील उदंरखेल या गावचे रहिवासी नानाभाऊ यांचे अपघात दुःखत निधन यांचे अंदाजे १७ दरम्यान होते हा एकलुता एक मुलगा असुन त्याच्या पाश्चात आई ज्योती व वडील नानाभाऊ व दोन अविवाहित लहान बहिणी आहेत या घटनेने उदंरखेल व पंचक्रोशीतील हळहळ व्यक्त आहे.



# आष्टीत रंगली विकासाची धुलवड

## पाण्यासाठी दोन माजी आमदार एकवटले आष्टी, पाटोदा,शिरूरच्या पाणी प्रश्नावर मंथन -व्यापक जनआंदोलन उभारण्याचा नेत्यांचा इशारा

आष्टी । प्रतिनिधी

रंगांचा सण असलेल्या धुलीवंदनाच्या दिवशी आष्टी तालुक्यात मात्र एका वेगळ्याचविकासाच्या धुलवडीचा रंग पाहायला मिळाला.मतदार संघातील शाश्वत विकासाचा आणि प्रामुख्याने पाणी या जिव्हाळ्याच्या प्रश्नावर तोडगा काढण्यासाठी माजी आ.भीमराव धोंडे आणि माजी आ.बाळासाहेब आजबे या दोन नेत्यांनी एकत्र येत रणशिंग फुंकले आहे.या महत्त्वपूर्ण बैठकीने मतदार संघातील राजकीय समीकरणे बदलण्याची नांदी दिली असून,तिन्ही तालुक्यांतील कार्यकर्त्यांनी याला उत्स्फूर्त पाठिंबा दर्शवला आहे.आष्टी येथील भगवान महाविद्यालयात मंगळवारी दि.३ मार्च रोजी ही विशेष बैठक पार पडली. यावेळी राष्ट्रवादीचे तालुकाध्यक्ष दिपक घुमरे (पाटोदा), आष्टी राष्ट्रवादीचे तालुकाध्यक्ष काकासाहेब शिंदे,माजी जि.प.सदस्य रामराव खेडकर, पराग आप्पासाहेब राख,पाटोदा कृ.उ.बा.समितीचे उपसभापती पांडुरंग नागरगोजे,हनुमंत थोरवे,आरपी आयचे आष्टी तालुकाध्यक्ष अशोक साळवे, माजी सभापती नियामत बेग,माजी सभापती अनिल जायभाये,सतीश मामा झगडे,सरपंच दादा जगताप,माऊली वाघ,सुदाम काका झिंजूरके,हरिभाऊ जंजिरे,संजय विधाते,अंकुश मुंडे,संभाजी ◀◀ पान ३ वर



This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# पुण्यातील नामांकित विद्यालयाचे ८४ जण दुबईमध्ये अडकले, इस्त्रायल-इराण युद्धाचा फटका, लवकरात लवकर भारतात आणण्यासाठी प्रयत्न सुरू

**पुणे । प्रतिनिधी**

पुण्यातील नामांकित विद्यालयाचे ८४ जणं दुबईमध्ये अडकले असल्याची माहिती समोर आली आहे. ८४ जणांमध्ये ८० विद्यार्थी आणि ४ शिक्षकांचा समावेश आहे. पुण्यातील नामांकित विद्यालयाचे सर्व विद्यार्थी सुरक्षित असल्याची माहिती समोर आली आहे. परराष्ट्र मंत्रालयाकडून पुण्यातील विद्यार्थ्यांना लवकरात लवकर भारतात आणण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. पुण्यातील नामांकित विद्यालयाचे विद्यार्थी स्टडी व्हिसिट साठी दुबई येथे गेले होते. कृपया कोणी ही घाबरून जाऊ नये, विद्यार्थ्यांना लवकरात लवकर मायदेशात आणले जाणार आहे असं आवाहन महाविद्यालयाकडून करण्यात आलं



आहे. नागरी विमान वाहतूक मंत्रालयाकडून सुद्धा विद्यार्थ्यांना परत आणण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत.

महाविद्यालयाचे डीन जनार्दन पवार, यांनी यासंदर्भात माहिती देताना सांगितलं की, सगळे विद्यार्थी सुखरूप आणि सुरक्षित आहेत. ४२ मुलं आणि ४२ मुली असा ८४ जणांचा विद्यार्थ्यांचा समूह दुबई येथे गेला होता. आम्ही या विद्यार्थ्यांच्या पालकांशी आणि दुबईमध्ये असलेल्या सगळ्या शिक्षकांशी सुद्धा संपर्कात आहोत. विद्यार्थ्यांना आणि पालकांना घाबरून न जाण्याचा आवाहन आहे. परराष्ट्र मंत्रालय तसंच भारतीय दूतावासासोबत महाविद्यालयाशी बोलणी सुरू आहे.

८४ मुले दुबई मध्ये अडकले आहेत. हे विद्यार्थी ग्लोबल इमर्शन कार्यक्रमासाठी गेले होते,सगळे विद्यार्थी सुखरूप आहेत. त्या ठिकाणी असलेली विद्यार्थी आणि आमच्या कॉलेजचा स्टाफ तिथे आहे त्यांच्या सोबत आमचा संपर्क झाला आहे,विद्यार्थीच्या पालक पण आमच्या संपर्कात आहे. ह्या कार्यक्रमासाठी ४२ मुल आणि ४२ मुली त्या कार्यक्रमासाठी गेले होते,हे सर्व विद्यार्थी संपर्कात आहेत, आमच्या युनिव्हर्सिटी कडून विदेश मंत्रालयांसोबत बोलणं सुरू आहे आमचं निवेदन पोहोचला आहे केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांच्यासोबतही आमचं बोलणं झालं आहे. दुबईमधील भारतीय दूतावास कार्यालयासोबतही आमच बोलणं झाला आहे, घाबरून न जाण्याचे आवाहन पालकांना करत आहोत.

# सुप्रसिध्द सायबर एक्सपर्ट नचिकेत दांडेकर यांचे टपाल तिकीट

**पुणे । प्रतिनिधी**

सायबर गुन्हे आणि डिजिटल सुरक्षेच्या क्षेत्रात महत्वपूर्ण योगदान देणाऱ्या पुण्यातील सुप्रसिद्ध सायबर एक्सपर्ट नचिकेत दांडेकर यांचा विशेष सन्मान करण्यात आला आहे. भारत सरकारच्या 'माय स्टॅम्प' (चू डींरा) योजने अंतर्गत त्यांचे वैयक्तिक टपाल तिकीट तयार करण्यात आले आहे.



हे टपाल तिकीट पुणे सिटी पोस्टच्या मुख्य कार्यालयाच्या सहकार्याने जारी करण्यात आले असून, हे देशभरात वैध असले तरी सामान्य टपाल तिकीटाप्रमाणे पत्र पाठवण्यासाठी वापरता येईल. आजच्या आधुनिक डिजिटल जगात ईमेल, व्हॉट्सअॅप, फेसबुक, इंस्टाग्राम यांसारख्या सोशल मीडियावर होणाऱ्या फसवणुकीपासून जनतेला सावध करण्यासाठी, तसेच सायबर गुन्ह्यांच्या तपासात पोलीस आणि इतर तपास यंत्रणांना मार्गदर्शन आणि सहकार्य करण्यात त्यांचे मोठे योगदान आहे. 'माय स्टॅम्प' ही भारत सरकारची जुनी योजना आहे, ज्यांत महान व्यक्ती किंवा महत्वपूर्ण योगदान देणाऱ्या व्यक्तींचे फोटो टपाल तिकीटावर छापले जातात. या योजनेतून नचिकेत दांडेकर यांचे टपाल तिकीट तयार करणे हे पुणे सिटी पोस्टसाठी एक आगळे-वेगळे पाऊल ठरले आहे. विशेष म्हणजे इतर टपाल तिकीटांप्रमाणेच देशात कोठेही हे टपाल तिकीट वापरून पत्र पाठविता येते. या कार्यक्रमास समीर धर्माधिकारी, पुणे सिटी पोस्ट मुख्य कार्यालयाचे पोस्ट मास्टर विलास घुले आणि त्यांचे सहकारी तसेच अॅड. सागर सातपुते उपस्थित होते.

# लोहगावमध्ये चिमुरडीला पळविण्याचा प्रयत्न; जमावाची संशयित आरोपींना मारहाण

**पुणे । प्रतिनिधी**

लोहगावमध्ये चार वर्षांच्या चिमुरडीला दुचाकीवर बसवून पळविण्याचा प्रयत्न झाला. मुलीच्या आईच्या फिर्यादीवरून संशयित तरुणाविरुद्ध अपहरणाचा गुन्हा दाखल झाला आहे. तसेच कायदा हातात घेऊन संबंधित तरुणाची मारहाण करणाऱ्या ५ ते ६ अज्ञात व्यक्तींवरही स्वतंत्र गुन्हा नोंदविला आहे.

ही घटना १ मार्च रोजी पहाटे पवारवस्ती भागात घडली. ४ वर्षे ९ महिन्यांची चिमुरडी घरासमोर खेळत असताना एक अल्पवयीन मुलगा दुचाकीवरून तेथे आला. त्याने मुलीचे तोंड दाबून तिला जबरदस्तीने दुचाकीवर बसवून नेण्याचा प्रयत्न केला. दरम्यान, कुटुंबातील एका महिलेने हा प्रकार पाहून आरडाओरडा केला. आवाज ऐकून मुलीची आई तात्काळ बाहेर धावली. संशयित



मुलीला घेऊन हरणतळे वस्तीच्या दिशेने सुमारे २०० मीटरपर्यंत गेला; मात्र नातेवाईक व स्थानिकांनी पाठलाग करून त्याला पकडले. चिमुरडीची सुरक्षित सुटका केली. त्यानंतर उपस्थित नागरिकांनी संशयिताला पोलिसांच्या ताब्यात दिले. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. यावेळी संतप्त जमावातील ५ ते ६ अज्ञातांनी संशयितांना मारहाण केली. या मारहाणीत त्याच्या डोक्याला व शरीरावर दुखापत झाली असून त्याला उपचारासाठी रुग्णालयात दाखल केले आहे.

# पुण्यात पहिली रोबोटिक रिव्हिजनल बॅरियाट्रिक शस्त्रक्रिया यशस्वी

**पुणे । प्रतिनिधी**

बदलती जीवनशैली, आहारातील असमतोल आणि शारीरिक हालचालींचा अभाव यामुळे लठ्ठपणाचे प्रमाण झपाट्याने वाढत आहे. परिणामी, मधुमेह, उच्च रक्तदाब, हृदयरोग यांसारख्या सहव्याधीही वाढताना दिसत आहेत. या पार्श्वभूमीवर लठ्ठपणावर उपचारासाठी वैद्यकीय क्षेत्रात अद्ययावत व सुरक्षित तंत्रज्ञान उपलब्ध होत आहे. योग्य तपासण्या, वैद्यकीय पार्श्वभूमी तपासून डॉक्टरांच्या सल्ल्याने हे उपचार प्रभावी ठरत असल्याचे तज्ज्ञांचे मत आहे.

लठ्ठपणाची तीवता मोजण्यासाठी बॉडी मास इंडेक्स (बीएमआय) तपासला जातो. ज्या रुग्णांचा 'बीएमआय' जास्त असून, सहव्याधी आहेत किंवा आधीच्या उपचारांनंतर अपेक्षित परिणाम मिळालेले नाहीत, अशा रुग्णांसाठी बॅरियाट्रिक शस्त्रक्रिया हा प्रभावी पर्याय ठरतो. या क्षेत्रातही तंत्रज्ञान झपाट्याने पुढे गेले असून, रोबोटच्या साहाय्याने बॅरियाट्रिक शस्त्रक्रिया अधिक अचूक, सुरक्षित आणि परिणामकारक होत आहेत. अलीकडेच पुण्यातील रुबी हॉल क्लिनिकमध्ये शहरातील पहिली रोबोटिक रिव्हिजनल बॅरियाट्रिक शस्त्रक्रिया यशस्वीरीत्या पार पडली. या शस्त्रक्रियेमध्ये पूर्वी करण्यात आलेल्या बॅरियाट्रिक शस्त्रक्रियेनंतर निर्माण झालेल्या गुंतागुंतींवर रोबोटिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने एकाच टप्प्यात प्रभावी उपचार करण्यात आले.

सध्या शस्त्रक्रियेविना वजन कमी करण्यासाठी कॅप्सूलच्या स्वरूपातील गॅस्ट्रिक बलून हा पर्याय उपयुक्त ठरत आहे. हा बलून पाण्यासोबत सहज गिळता येतो. जठरात पोहोचल्यानंतर तो फुगवण्यात येतो आणि पोटात जागा व्यापल्यामुळे लवकर पोट भरल्याची भावना निर्माण होते. त्यामुळे भूक नियंत्रित राहून खाण्याचे प्रमाण नैसर्गिकरीत्या कमी होते. या प्रक्रियेसाठी शस्त्रक्रिया, भूल किंवा एंडोस्कोपीची गरज नसते. हा बलून चार महिन्यांपर्यंत पोटात राहून नंतर आपोआप रिकामा होतो आणि नैसर्गिकरीत्या शरीराबाहेर पडतो. योग्य आहार, व्यायाम आणि पोषणतज्ज्ञांच्या मार्गदर्शनासोबत चार महिन्यांत साधारण १५ ते २० टक्के वजन घट होऊ शकते.

पश्चिम भारतातील बॅरियाट्रिक शस्त्रक्रियेच्या क्षेत्रात महत्त्वपूर्ण टप्पा गाठत पहिली रोबोटिक रिव्हिजनल बॅरियाट्रिक शस्त्रक्रिया यशस्वीरित्या पार पडली. ही जटिल शस्त्रक्रिया रोबोटिक बॅरियाट्रिक व डव्हान्स्ड लॅप्रोस्कोपिक सर्जन डॉ. केदार पाटील यांनी बहुविशेषज्ञीय टीमसह केली. संबंधित रुग्णावर सुमारे दीड वर्षांपूर्वी दुसऱ्या केंद्रात लॅप्रोस्कोपिक स्लीव्ह गॅस्ट्रेक्टॉमी करण्यात आली होती. त्यानंतर तिला मध्यम आकाराचा हायटल हर्नियां, आम्लपित्त (सिड रिफ्लक्स) आणि लक्षणीय पित्ताशयातील खडे (गॉलस्टोन्स) अशी समस्या निर्माण झाली. प्रगत रोबोटिक तंत्रज्ञानाचा वापर करून शस्त्रक्रिया यशस्वीरीत्या पूर्ण झाली असून, रुग्णाची प्रकृती उत्तम आहे.

# मेट्रो सेवा तब्बल नऊ तास बंद; गैरसोय झाल्यामुळे प्रवाशांतून संतप्त

**पुणे । प्रतिनिधी**

पुणे मेट्रोतर्फे धुलिवंदनाचे कारण देत मंगळवारी सकाळी ६ ते दुपारी ३ वाजेपर्यंत मेट्रो सेवा बंद ठेवल्यामुळे अनेक पुणेकरांना गैरसोयीचा सामना करावा लागला. अनेक प्रवाशांनी या निर्णयाबद्दल मेट्रो प्रशासनावर



टीका केली. सार्वजनिक वाहतूक सेवा सणांनिमित्त बंद राहात असेल, तर तिला सार्वजनिक सेवा म्हणणे योग्य ठरेला का, असा प्रश्नही नागरिकांनी उपस्थित केला.

पुणे मेट्रोच्या संकेतस्थळावर उपलब्ध आकडेवारीनुसार साधारणपणे २ लाख पुणेकर दररोज मेट्रो सेवेचा वापर करतात. शनिवार किंवा रविवारसारख्या सुट्टीच्या दिवशीही या आकडेवारीत लक्षणीय घट होत नाही. तसेच अनेक प्रशासकीय कार्यालये, शाळा, महाविद्यालये, खासगी कार्यालये आणि इतर संस्थांना सणांच्या दिवशी सुट्टी असतानाही मेट्रो सेवेचा वापर वाढला असल्याचे वारंवार निरीक्षणात आले आहे. असे असतानाही धूलिवंदनाच्या दिवशी मेट्रो सेवा सुमारे ९ तासांसाठी बंद होती. मेट्रो ही पीएमपीएमएल, एसटी महामंडळ, रेल्वे व विमान वाहतूक सेवांप्रमाणे एक सार्वजनिक वाहतूक सेवा आहे. या सेवा कोणत्याही सणाच्या दिवशी कोणतीही सुट्टी न घेता वर्षातील ३६५ दिवस आणि २४ तास सुरू राहात असताना मेट्रो सेवा बंद का केली जाते, असा प्रश्न नागरिकांतून उपस्थित केला जात आहे.

# क्षेत्रीय कार्यालयांची कसोटी ; महिनाभरात काढाव्या लागणार दीडशे कोटींच्या निविदा

**पुणे । प्रतिनिधी**

महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांनी यंदा १५ क्षेत्रीय कार्यालयांना पावसाळापूर्व रस्ते दुरुस्ती, नाले आणि ड्रेनेज सफाईसाठी प्रत्येकी १० कोटी रुपये असे एकूण १५० कोटींचा निधी उपलब्ध करून दिला आहे. या निधीतून पुढील महिनाभरात निविदा प्रक्रिया पूर्ण करून कार्यादेश देणे आणि प्रत्यक्ष कामांना सुरुवात करण्याची जबाबदारी संबंधित क्षेत्रीय कार्यालयांवर सोपविण्यात आली आहे. त्यामुळे परिमंडळ उपायुक्त



आणि क्षेत्रीय कार्यालयांची मोठी कसोटी लागणार आहे. कामे वेळेत पूर्ण न झाल्यास त्याचा थेट फटका पुणेकरांना बसण्याची शक्यता आहे. दरवर्षी मुख्य पथ विभाग आणि ड्रेनेज विभागामार्फत पावसाळापूर्व कामे केली जातात. यासाठी संपूर्ण शहराचे झोननिहाय विभाजन करून निविदा काढल्या जातात. मात्र, मुख्य खात्यांकडे मनुष्यबळ अपुरे असल्याचे कारण देत ही जबाबदारी क्षेत्रीय कार्यालये आणि परिमंडळ उपायुक्तांकडे सोपविण्यात आली आहे.

या अंतर्गत खड्डे दुरुस्तीसाठी १ कोटी, देखभाल-दुरुस्तीच्या कामांसाठी ३ कोटी, पदपथ व त्यावरील सार्वजनिक कामांसाठी २ कोटी असे एकूण ९० कोटी रुपये देण्यात आले आहेत. तसेच, ड्रेनेज सफाईसाठी प्रत्येकी १ कोटी, पावसाळी लाइन सफाईसाठी १ कोटी आणि नाले सफाईसाठी १ कोटी असे मिळून ४५ कोटींचा निधी देण्यात आला आहे. याशिवाय समाविष्ट गावांतील नाले सफाईसाठी स्वतंत्र १ कोटी रुपये देण्यात आले आहेत. अशा प्रकारे एकूण १५० कोटींचा निधी वितरित करण्यात आला आहे. मात्र, मार्च महिना सुरू होऊनही आणि चालू आर्थिक वर्ष संपण्यास अवघा एक महिना शिल्लक असतानाही अनेक क्षेत्रीय कार्यालयांनी अद्याप निविदा प्रक्रिया सुरू केलेली नाही. त्यामुळे प्रशासनाला उर्वरित काळातच निविदा प्रक्रिया पूर्ण करून प्रत्यक्ष कामांना सुरुवात करावी लागणार आहे.

# पुण्यात होळीच्या कार्यक्रमात मोठी दुर्घटना; लाईटचा गर्डर कोसळून १५ जण जखमी



**पुणे । प्रतिनिधी**

महाराष्ट्रासह देशभरात मोठ्या उत्साहत होळी साजरी केली जात आहे. अनेक ठिकाणी होळीनिमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. दरम्यान पुण्यात होळीच्या कार्यक्रमाला गालबोट लागलं आहे. कोरेगाव पार्क मुंढवा रोडवर एका होळीच्या कार्यक्रमात लाईटचे गर्डर पडून अनेकजण जखमी झाल्याची माहिती समोर येत आहे. यातील जखमींना रुग्णालयात दाखल केलं असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. एकाची प्रकृती गंभीर असल्याचं सांगण्यात येतंय.

याबाबत मिळालेली माहिती अशी की, होळीनिमित्त कोरेगाव पार्क-मुंढवा रोडवर रॉयर फार्ममध्ये एका भव्य अशा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. एका खासगी कंपनीने आयोजित केलेल्या या कार्यक्रमासाठी एक हजार पेक्षा जास्त तरुण तरुणींनी हजेरी लावली होती. याच कार्यक्रमात अचानक लाइटचा गर्डर कोसळून दुर्घटना घडली आहे. गर्डर काही तरुणांच्या अंगावर पडल्यानं १५ ते १६ जण जखमी झाले आहेत. यात तरुण तरुणींचा समावेश आहे. गर्डर पडून जखमी झालेल्यांपैकी चौघांना ससून रुग्णालयात दाखल करण्यात आल्याचं पोलिसांनी सांगितलंय. तर एकाची प्रकृती गंभीर असल्याचीही माहिती समोर येतेय. दरम्यान, या कार्यक्रमाला परवानगी होती का? तरुण तरुणी दारुच्या नशेत असल्याचंही म्हटलं जातंय. याबाबत पोलिसांनी अद्याप अधिकृत माहिती दिलेली नाही.

# खडकवासला ते हिंजवडी मेट्रो मार्ग; केंद्रीय राज्यमंत्री मोहोळ यांनी दिल्या प्रकल्प आराखडा तयार करण्याच्या सूचना

**पुणे । प्रतिनिधी**

लोहगाव येथील आंतरराष्ट्रीय विमानतळ मेट्रोने जोडला जाणे आवश्यक आहे. त्यासाठी प्रयत्न केले जात होते. सहा विविध मार्गांवर चर्चा होऊन त्यातील व्यावहारिक मार्ग अंतिम करण्यात आला आहे. त्यामुळे आता विमानतळ थेट मेट्रो मार्गाने जोडले जाईल, अशी माहिती खासदार केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी दिली. त्याचबरोबर खडकवासला ते हिंजवडी या मेट्रो मार्गासाठी विस्तृत प्रकल्प आराखडा (डीपीआर) तयार करण्याच्या सूचनाही प्रशासनाला दिल्याचेही मोहोळ यांनी नमूद केले.



शहर आणि परिसरातील विविध विकासकामे आणि प्रकल्पांसंदर्भात मोहोळ यांनी नुकतीच प्रशासनाच्या विविध विभागांच्या अधिकाऱ्यांसमवेत बैठक घेऊन आढावा घेतला. या वेळी महापौर मंजुषा नागपुरे, उपमहापौर परशुराम वाडेकर, स्थायी समितीचे अध्यक्ष श्रीनाथ भिमाले. भाजपचे शहराध्यक्ष धीरज घाटे, महापालिका आयुक्त नवलकिशोर राम, पीएमआरडीएचे आयुक्त योगेश म्हसे, महामेट्रोचे कार्यकारी संचालक श्रावण हर्डीकर, लोहगाव विमानतळाचे संचालक संतोष ढोके, हवाई दलाचे अधिकारी, तसेच विविध शासकीय विभागांचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते. बैठकीत पुणे आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या धावपट्टीच्या विस्तारीकरणासाठी विमानतळाभोवती पर्यायी रस्ता तयार करण्यासंदर्भातही सविस्तर चर्चा झाल्याचे मोहोळ यांनी सांगितले. नदीसुधार आणि नदी पुनरुज्जीवन प्रकल्पाच्या कामाचाही आढावा घेत काम वेगाने पूर्ण करण्याच्या सूचना मोहोळ यांनी दिल्या. समान पाणीपुरवठा योजनेच्या अंतिम टप्प्यात उर्वरित साठवणूक टाक्यांचे व जलवाहिन्यांचे, तसेच मीटर बसविण्याचे काम त्वरित पूर्ण करण्याचे निर्देशही त्यांनी दिले.

गेल्या काही दिवसांत शहरातील प्रदूषणात वाढ झाली आहे. याबाबत योग्य त्या उपाययोजना तातडीने कराव्यात, तसेच शहरातील पदपथ अतिक्रमण मुक्त केले जावेत. महापालिकेच्या माध्यमातून साकारलेल्या भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी वैद्यकीय महाविद्यालयाची नवीन इमारत आणि वसतिगृह इमारतीच्या सद्यस्थितीचा आढावा घेत हे कामही निर्धारित वेळेत पूर्ण करण्यात यावे, असे निर्देश मोहोळ यांनी दिले.

# शेतात जाण्याच्या वादातून लाथा-बुक्क्यांनी केलेल्या मारहाणीत वृद्धाचा मृत्यू

**राजगुरुनगर। प्रतिनिधी**

ढोरे भांबुरवाडी (ता. खेड) येथे शेतातील वादातून झालेल्या मारहाणीत ७५ वर्षीय वृद्धाचा मृत्यू झाल्याची घटना मंगळवारी (दि. ३) घडली. या घटनेत सोपान तुकाराम भांबुरे यांचा मृत्यू झाला. या प्रकरणी त्यांच्या पत्नीने खेड पोलीस ठाण्यात पाच जणांविरुद्ध तक्रार दाखल केली आहे.

शिवाजी पांडूरंग भांबुरे, किरण शिवाजी भांबुरे, आशा सुभाष भांबुरे, सोनाली किरण भांबुरे, अरुणा शिवाजी (सर्व रा. ढोरे भांबुरवाडी, ता. खेड) यांच्या विरोधात खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मृत सोपान तुकाराम भांबुरे हे त्यांच्या पत्नी चंद्रकला यांच्यासह दुपारी सुमारे पावणेचार वाजता त्यांच्या 'दरा' नावाच्या शेतात होते. तेव्हा त्यांचा मुलगा रामदास भांबुरे गहू घरी नेण्यासाठी शेतात आला होता. यावेळी भावकीतील लोकांनी घटनास्थळी येऊन संगनमताने तुम्ही या शेतात यायचे नाही असे म्हणत शिवीगाळ आणि दमदाटी केली. त्यानंतर आरोपींनी सोपान भांबुरे आणि त्यांच्या पत्नीला हाताने, लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. मृत सोपान भांबुरे खाली पडल्यानंतरही आरोपींनी त्यांच्या छातीवर लाथा-बुक्क्यांनी मारहाण केली. मारहाणीनंतर सोपान भांबुरे यांना चक्कर आल्याने त्यांना खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला.

# रसिकलाल धारीवाल यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ ९वे वार्षिक रक्तदान शिबिर संपन्न

**पुणे । प्रतिनिधी**

आर. एम. धारीवाल फाउंडेशन तर्फे समाजसेवेची अखंड परंपरा जपत रसिकलाल धारीवाल यांच्या जन्मदिनानिमित्त ९वे वार्षिक रक्तदान शिबिर यंदा उत्साहपूर्ण वातावरणात आणि अभूतपूर्व प्रतिसादात यशस्वीरीत्या पार पडले. समाजातील विविध स्तरांतील नागरिकांच्या स्वयंस्फूर्त सहभागामुळे तब्बल ३५० रक्तदात्यांनी रक्तदान करून सामाजिक बांधिलकीची जाणीव अधोरेखित केली. विशेष उल्लेखनीय बाब म्हणजे यंदाच्या शिबिरात दुर्मिळ समजला जाणारा छशसरींळींश रक्तगटाच्या ५ पिशव्यांचे संकलन करण्यात आले. आपतकालीन परिस्थितीत अत्यंत उपयुक्त ठरणारा हा रक्तगट उपलब्ध झाल्याने शिबिर महत्त्वपूर्ण ठरले. या शिबिरात के. ई. एम. रुग्णालय,



पूना हॉस्पिटल, इनलॅक्स रुग्णालय तसेच आर एम धारीवाल फाऊंडेशनची ब्लड कलेक्शन व्हॅन या रक्तपेढ्यांचा सहभाग होता.

या प्रसंगी मराठी अभिनेते सिद्धार्थ जाधव यांची विशेष उपस्थिती होती. तसेच उद्योजक पोपटलाल ओसवाल, प्रदीप राठी आणि आकाश राठी, अध्यक्ष लातूर अर्बन को-ऑप. बँक लिमिटेड यांनीही शिबिराला भेट दिली. विशेष म्हणजे आकाश राठी यांनी केवळ उपस्थिती लावली नाही, तर स्वतः रक्तदान ही केले. याशिवाय पुण्यातील विविध गणपती मंडळांचे पदाधिकारी तसेच शहरातील मान्यवर व प्रतिष्ठित व्यक्तींनी उपस्थित राहून या सामाजिक उपक्रमाला पाठिंबा दर्शविला. कायद्याची अंमलबजावणी यंत्रणेतील वरिष्ठ अधिकाऱ्यांनीही शिबिराला उपस्थित राहून सामाजिक उपक्रमाबद्दल समाधान व्यक्त केले. सागर कवडे, पोलिस उपायुक्त मुख्यालय, विजयकुमार डोके, कोरेगाव पार्क सिनिअर पी आय आणि कैलास गायकवाड, सहसचिव महसूल, मंत्रालय. नगरसेविका स्वप्नाली पंडित यांनी प्रत्यक्ष उपस्थित राहून अभिनंदन केले. विशेष म्हणजे विजयकुमार डोके, कोरेगाव पार्क सिनिअर पी आय यांनी स्वतः रक्तदान करून सामाजिक जबाबदारीचे आदर्श उदाहरण घालून दिले. आर. एम. धारीवाल फाउंडेशनच्या सामाजिक विकासाच्या सातत्यपूर्ण उपक्रमांचा भाग म्हणून हरे कृष्ण मिशन पुणे, आर. एम. डी. स्कूल अँड कॉलेज रांजणगाव, साधू वासवाणी मिशन, सिद्धातिशय क्षेत्र कुंडल आणि श्री आदिनाथ दिगंबर जैन मंदिर वाल्हे या संस्थांना चेक वाटप करण्यात आले. उपस्थितांना ६ फूट उंचीची १५० देशी रोपे विनामूल्य वितरित करण्यात आली. तसेच जान्हवी धारीवाल बालन यांच्या संकल्पनेतील वृक्ष पुनर्रोपण या प्रकल्पाचे विशेष माहितीपट शिबिरस्थळी प्रदर्शित करण्यात आला.समाजहित, आरोग्य संवर्धन आणि मानवी जीवन वाचविण्याच्या ध्येयाने आयोजित हे रक्तदान शिबिर समाजातील एकात्मता, सेवाभाव आणि सामाजिक उत्तरदायित्व अधिक दृढ करणारे ठरले. रसिकलाल धारीवाल यांच्या स्मृतीस विनम्र अभिवादन करत, हा उपक्रम आगामी काळात अधिक व्यापक स्वरूपात राबविण्याचा फाउंडेशनच्या अध्यक्षा जान्हवी धारीवाल बालन आणि उपाध्यक्षा शोभाताई धारीवाल यांचा निर्धार असल्याचे नमूद करण्यात आले.